
# पोलीस पाटील

## मार्गदर्शिका



संकल्पना :
**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, बुलडाणा

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

## आमचा निर्धार-कोरोना मुक्त बुलडाणा

**100%**
**लसीकरण**

## जिल्ह्यातील सर्व नागरीकांनी लस घ्यावी...



**अरविंद चावरिया** भा.पो.से.
पोलिस अधीक्षक, बुलडाणा

कोरोना प्रतिबंधक लस सुरक्षित आहे. मी दुसरा ही डोस घेतला आहे.
जिल्ह्यातील प्रत्येकाने ही लस घेवून, स्वतःला सुरक्षित करावे.
रोग प्रतिकार शक्ती वाढवणे हाच कोरोनापासून बचावाचा उपाय आहे.
लसीमुळे अशी शक्ती वाढते म्हणूनच मी लस घेतली, तुम्हीही घ्या...

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

# पोलीस पाटील मार्गदर्शिका

क्षण कोणताही असो, सेवेसाठी सदैव तत्पर

◆ संकल्पना ◆

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक बुलडाणा

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

नियंत्रण कक्ष - बुलडाणा

☎ ०७२६२ - २४२४००

◆ प्रकाशक ◆

# पोलीस अधीक्षक
# पोलीस अधीक्षक कार्यालय

बुलडाणा

**फक्त खाजगी वितरणासाठी**

◆ मुद्रण स्थळ ◆

**मयुरेश क्रिएशन**

शास्त्री मोहल्ला, जालना

Ph. 9822075026, 8007170808

**जनहितार्थ विनामूल्य**

**Declaration :** ही पुस्तिका केवळ एक संदर्भ पुस्तिका असून यातील मजकूर कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात जशाचा तसा ग्राह्य ठरणार नाही. त्याकरिता संबंधित कायद्याचे पुस्तकाचा / शासन निर्णयाचा संदर्भ घेण्यात यावा.

# समर्पित

जनतेची सेवा करीत असतांना
देशासाठी शहिद झालेले
सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी
यांच्या पवित्र स्मृतिस
ही माहिती पुस्तिका
अर्पण...

अरविंद चावरिया
पोलीस अधीक्षक
बुलडाणा

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | कायदा व जनतेची कर्तव्ये | ११ |
| २. | पोलीस पाटील महाराष्ट्र ग्राम पोलीस कायदा : महत्त्वाची कलमे | १४ |
| ३. | पोलीस पाटीलाचे दप्तर | २८ |
| ४. | आपले शेजारी खरे पहारेकरी | ४० |
| ५. | आठ सूत्री | ४६ |
| ६. | पोलीस पाटील-गावचा फौजदार | ५२ |
| ७. | महत्त्वाचे शासन निर्णय | ५६ |
| ८. | पोलीस पाटलांनी कर्तव्य पार पाडण्याबाबत काही व्यवहार्य सूचना : गुन्ह्याला प्रतिबंध | ६२ |
| ९. | हुंडाबळी प्रतिबंध-पोलीस पाटील | ६९ |
| ९. | ग्रामसंरक्षण दल व पोलीस पाटील | ७० |
| १०. | ग्रामरक्षक दलाची अपेक्षित कर्तव्ये | ७१ |
| ११. | पोलीस दलाचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक | ७७ |

# मनोगत

पोलीस पाटील हे नाव उच्चारताच सामान्य नागरिकांसमोर एक प्रतिष्ठित, त्या भागात दबदबा असणारे असे व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर उभे राहते. गाव पोलीस पाटील ही पद्धत फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. सन १९६७ साली महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र ग्राम पोलीस कायदा अस्तित्वात आणून त्यात पोलीस पाटलांच्या अधिकारांची व कर्तव्यांची तरतूद केलेली आहे.

अलीकडील काळात पोलीस पाटील यांना पूर्वी जे महत्त्व होते, गावकऱ्यांमध्ये जी प्रतिमा होती ती हळूहळू कमी होत असल्याचे जाणवत आहे. यासाठी बऱ्याच गोष्टी कारणीभूत असू शकतात. त्यातील एक अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे पंचायत राज संस्थेचा उदय हे सुद्धा आहे. परंतु या संस्थेच्या उदयामुळे पोलीस पाटील यांचे अधिकार किंचितही कमी झालेले नाहीत. वरिष्ठ अधिकारी पोलीस स्टेशनच्या वार्षिक तपासणी घेत असताना वार्षिक तपासणीचा एक भाग म्हणून त्या भागातील पोलीस पाटलांची एक बैठक बोलावण्यात येत असते. अशा बैठकीमध्ये पोलीस पाटलांबरोबर चर्चा करण्याचा योग वरिष्ठ अधिकाऱ्यांना येतो. सदर चर्चेमध्ये बहुतांशी पोलीस पाटलांना त्यांचे अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव नसल्याचे आढळून आलेले आहे. पोलीस पाटील हे गाव पातळीवरील शासकीय प्रतिनिधी असून, त्यांना त्यांचे अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव असणे अतिशय आवश्यक आहे. पोलीस पाटील यांची शैक्षणिक पात्रता लक्षात घेता त्यांच्याकरिता केलेले कायदे व अधिनियम हे फार किचकट स्वरूपाचे निश्चितच नाहीत. परंतु ते त्यांना माहीत नाहीत. म्हणजेच याबाबतची त्यांची असलेली उदासीनता कारणीभूत असू शकते.

आजकाल प्रत्येक खात्याचा पूर्ण वेळ गाव पातळीपर्यंत शेवटचा दुवा म्हणून काम करीत आहे. पोलीस पाटील सुद्धा पोलीस खात्याचा एक गाव पातळीवरील अधिकारी असून कायद्याने त्यांना आपले कर्तव्य परिणामकारक

बजावता येईल इतके अधिकार प्रदान केलेले आहेत. पूर्वी चाकू, तलवारीचे गुन्हे, जाळपोळ, जातीय स्वरूपाचे दंगलीचे प्रकार हे फक्त शहरापुरतेच मर्यादित असायचे, परंतु आजकाल चाकू, तलवारी असे शहरात असणारे सर्व प्रकार हे आपणास खेड्यापाड्यांत सुद्धा पाहावयास मिळत आहेत. राजकीय कारणांवरून दंगली तर शहरापेक्षा जास्त प्रमाणावर खेड्यांमध्ये घडत असतात. या सर्व गोष्टी हाताळण्यासाठी व विशेषत: स्त्रिया, दुर्बल घटक व मागासवर्गीयांवर होणारे अत्याचार या गोष्टींना पायबंद घालण्यासाठी प्रत्येक गावात पोलीस पाटील हा सक्षम व समर्थ असणे जरूरीचे आहे. पोलीस पाटील सक्षम तेव्हाच होऊ शकतो, जेव्हा त्यास आपल्या अधिकारांची, कर्तव्यांची पूर्ण जाण असते.

या पुस्तिकेत पोलीस पाटील यांच्या दैनंदिन कामकाजात साहाय्यभूत ठरतील असे विषय, सरकारी सूचना, अधिनियम एकत्रित स्वरूपात मांडण्यात आलेले आहेत. सदर पुस्तिकेचा उद्देश एकच आहे आणि तो म्हणजे पोलीस पाटलांना त्यांच्या अधिकारांची व कर्तव्यांची जाणीव करून देणे. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे. यापुढे पोलीस पाटील पुस्तिकेचा अभ्यास करून तसेच आपल्या भोवतालच्या वातावरणाचा अभ्यास करून सतत सतर्क राहून कार्य केले पाहिजे. पोलीस पाटलांचे राहणीमान, विचारसरणी, वागणे, बोलणे इत्यादीबाबत सुधारणा होऊन इतर व्यक्तीवर नैतिक प्रभाव पडेल अशा पद्धतीने नेतृत्त्व तयार झाले पाहिजे. त्यासाठी पोलीस पाटलांनी स्वत: चांगल्या सवयी जडविणे, कार्यक्षम राहणे अतिशय गरजेचे आहे. त्याच प्रयत्नांचा हा छोटासा भाग आहे. या पुस्तिकेमुळे पोलीस पाटलांची उदासीनता थोडी जरी कमी झाली तरी उद्देश सफल झाल्याचे समाधान आम्हास लाभणार आहे.

**– अरविंद चावरिया**

पोलीस अधीक्षक, बुलडाणा

# आपला गाव

(अभ्यासपूर्वक व अचूकपणे माहिती भरावी)

गावाचे नाव ____________________

तालुका ____________________

पोलीस ठाण्याचे नाव ____________________

दूरध्वनी क्रमांक ____________________

गावाची एकूण लोकसंख्या : ____________________

हिंदू: __________ मुस्लिम: __________ दलित : __________ इतर: __________

एकूत मतदार संख्या : ____________________

पुरुष : __________ स्त्रिया : __________ एकूण : __________

एकूण ग्रामपंचायत सदस्यांची संख्या : ____________________

एकूण मंदिरांची नावे व त्यांची संख्या : ____________________

____________________

____________________

____________________

एकूण मशिदींची नावे व त्यांची संख्या: ____________________

____________________

____________________

____________________

इतर धार्मिक स्थळांची माहिती : ____________________

____________________

____________________

____________________

एकूण शाळा (नावांसह):

एकूण महाविद्यालये (नावांसह):

एकूण सिनेमागृहे (नावांसह):

एकूण हॉटेल्स (नावांसह):

एकूण लॉज़ेस (नावांसह):

महत्त्वाचे साजरे होणारे सण (तिथीसह):

साजरे होणारे उत्सव (तिथीसह):

बाजाराचा दिवस:

गावाची इतर काही वैशिष्ट्ये:

पूर परिस्थितीबाबत टिप्पणी:

गावातील राजकीय पक्ष व त्यांचे नेतृत्त्व करणाऱ्या व्यक्ती:

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

पक्ष: ______________________ व्यक्तींचे नाव: ______________________

गावातील हिस्टरीशीटरची नावे: ______________________

______________________

______________________

______________________

______________________

______________________

गावातील धार्मिक/कायदा व सुव्यवस्था संदर्भातील जुने वाद असल्यास त्यांची थोडक्यात माहिती : ______________________

______________________

______________________

वृत्तपत्र प्रकाशित होत असेल तर वृत्तपत्राचे व संपादकाचे नाव :

______________________

______________________

इतर माहिती असल्यास त्यांच्या नोंदी : ______________________

______________________

______________________

______________________

# कायदा व जनतेची कर्तव्ये

**नागरिकांची मुलभूत कर्तव्ये:-**

समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच शांतता आणि स्वास्थ्य कायम राहणे हे अत्यंत आवश्यक असते. कायदा व सुव्यवस्था राखणे पोलीस खात्याचे आद्य कर्तव्य आहे. परंतु हे साध्य होण्यासाठी पोलिसानां समाजातील प्रत्येक नागरिकांचे सहकार्य असणे तितकेच महत्त्वाचे आहे. पोलिसांची कर्तव्ये,जबाबदाऱ्या याबाबत अनेकांनी लिहिलेले आहेत. चर्चा केलेली आहे. आपल्या शासनानेही पोलीस खात्यासाठी सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीदवाक्य निश्चित केलेले आहे. त्याचप्रमाणे विविध फौजदारी कायद्यांनी पोलिसांना पुरेसे अधिकारही दिलेले आहेत. परंतु कायदा व सुव्यवस्था राखण्यास तसेच समाजात शांतता व स्वास्थ्य राखण्यासाठी जनतेनेही आपली काही कर्तव्ये केली पाहिजेत. या कर्तव्यांची सर्वांना जाणीव व माहिती असावी म्हणून या लेखात माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रत्येक नागरिकाने आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांची पण जाण ठेवली पाहिजे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच समाजात शांतता व स्वास्थ्य नांदण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान सामाजिक किंवा नैतिक कर्तव्ये पाळली पाहिजेत. मानवी जीवनात नैतिक मूल्यांची जोपासना करणे हे अत्यंत आवश्यक आहे. ज्या क्षणी मनुष्याला नैतिक मूल्यांचा विसर पडतो किंवा नैतिक मूल्यांविरूद्ध वागतो त्यावेळी त्याच्यामध्ये माणुसकी राहत नाही. शासनाने फौजदारी व दिवाणी क्षेत्रांत विविध प्रकारचे कायदे संमत केलेले आहेत. या सर्व कायद्यांना नैतिक अधिष्ठान आहे. प्रचलित व अंमलात असलेल्या प्रत्येक कायद्याचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. विशेषत: फौजदारी स्वरूपाचे

कायद्यांचे उल्लंघन केले तर दोषी व्यक्तीस कायद्यात शिक्षा सांगितली आहे. प्रचलित सर्व कायद्यांचे पालन करणे हे जसे आपले महत्त्वाचे कर्तव्य आहे तसेच आपली जी राज्यघटना आहे तिचा आदर करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्याप्रमाणेच दुसऱ्यालाही समान हक्क, प्रतिष्ठा आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. समाजामध्ये अनेक कुटुंबे एकत्रित आलेली असतात. समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. मी सुखी आहे, मी समाधानी आहे एवढे मानून चालणार नाही. आपल्याप्रमाणे इतर सर्व जण सुखी असले पाहिजेत ही वृत्ती अंगी बाणली पाहिजे.

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना अनेक मूलभूत हक्क दिलेले आहेत. आपण फक्त आपल्या हक्कांपुरतेच जागृत असतो. परंतु घटनेने आपल्याकडून काही कर्तव्यांचीही अपेक्षा केलेली आहे. ही कर्तव्ये पण आपण काटेकोरपणे पार पाडली पाहिजेत. वस्तुत: हक्क व कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कर्तव्यपूर्ती झाली की हक्क आपोआपच मिळतात. कर्तव्याशिवाय हक्क म्हणजे सावलीशिवाय मनुष्य अशी स्थिती असते. आपल्या राज्यघटनेने मूलभूत हक्काप्रमाणेच मूलभूत कर्तव्ये पण सांगितलेली आहेत, ती अशी–

१. राज्यघटनेशी एकनिष्ठ राहून तिच्या उद्दिष्टांचा, संस्थाचा तसेच राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांना मान राखणे.

२. राष्ट्रीय स्वातंत्र्यांच्या चळवळीला प्रवृत्त करणाऱ्या उदात्त तत्त्वाबद्दल आदर बाळगून त्या तत्त्वाचे पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्त्व, एकता व एकात्मता या तत्त्वांना धरून त्यांचे रक्षण करणे.

४. राष्ट्राचे सरंक्षण करणे व त्यासाठी राष्ट्राने आवाहन केले असता योग्य ती सेवा देणे.

५. धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा प्रांतिक भेदभाव नष्ट करून सर्व

नागरिकांत ऐक्य व भ्रातृभावनेची वाढ करणे, स्त्रियांची प्रतिष्ठा कमी होईल अशा पद्धतींचा त्याग करणे.

६. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचा आदर करून तो जतन करणे.

७. जंगले, सरोवरे, नद्या व वन्यजीव यासह सर्व नैसर्गिक साधनसामुग्रीचे संरक्षण करून त्यात सुधारणा घडवून आणणे व सजीव प्राण्यांबद्दल करूणा बाळगणे.

८. शास्त्रीय आवड, मानवता, चौकसबुद्धी व पुरोगावी दृष्टिकोन यांचा विकास साधणे.

९. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे व हिंसाचाराचा त्याग करणे.

१०. व्यक्तिगत व सामाजिक सर्व क्षेत्रात उत्कृष्टता साधण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करून राष्ट्राला सतत परिश्रम आणि ध्येयपूर्ती याबाबत उच्च पातळीवर राहता येईल असा प्रयत्न करणे.

वरील मूलभूत कर्तव्यांचे नागरिकांनी तंतोतंत पालन करणे अत्यंत जरूरीचे आहे. त्यामुळे आपल्या देशात अनुशासन पर्वाची सुरूवात होऊन शिस्त लागणार आहे.

■ ■ ■

# पोलीस पाटील महाराष्ट्र ग्राम पोलीस कायदे महत्त्वाची कलमे १ ते १६

पोलीस पाटील हा शासनाचा एक महत्वाचा घटक आहे. कायदा –सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस पाटलांवर असते. पोलीस पाटलांची कर्तव्ये आणि अधिकार या संबंधी महाराष्ट्र ग्राम पोलीस अधियिम १९६७ या मध्ये महत्त्वाच्या तरतूदी दिल्या आहेत. प्रत्येक पोलीस पाटलास त्यांच्या अधिकारांबद्दल आणि कर्तव्यांबाबत कायदेशीर माहिती असणे आवश्यक आहे.

**पूर्वेतिहास :**

पोलीस हा शब्द शहर किंवा नगर राज्य आणि राज्याची परिस्थिती, राज्यघटना या अर्थाच्या मूळ ग्रीक शब्दापासून निघालेला आहे. लोकांच्या जीवितांचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे, गुन्ह्यांचा तपास करून गुन्हेगारांना शोधणे, त्यांना न्यायाधीशासमोर हजर करणे, गुन्हा केल्याचे पुरावे सादर करून गुन्हेगारांना कारागृहात पाठविण्यासाठी न्यायालयाचा आदेश मिळविणे, गुन्ह्यांना आळा घालणे, समाजात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करणे इत्यादी कामांचा पोलिसांच्या कर्तव्यांत समावेश होता. ऋग्वेद काळात, रामायण काळात ही अशी व्यवस्था होती. वीरक किंवा रक्षक हे त्या काळातले पोलीस होते. गुप्त काळात चाट, प्रतिहार काळात चाणक्यने दंड पाशिक होते. चंद्रगुप्त मौर्याच्या काळात चाणक्याने दंडपाशिक, चौरोद्धारणिक नेमले होते. त्या काळातले पोलीस दल गोपदल म्हणूनही ओळखले जात होते. मोगल काळात ठाणेदार, दारोगा यांच्या नेतृत्वाखालीच दफादार, जमादार काम करीत असत. पुढे विजयनगरच्या राज्य व्यवस्थेत आणि महाराष्ट्रातही ही व्यवस्था चालू राहिली.

महाराष्ट्रातील खेडेगावांत करवसुलीचे काम आणि कायदा–सुव्यवस्था टिकविण्याचे दायित्व वतनदार पाटील आणि त्याच्या हाताखालील रामोशी, भिल्ल जागल्या यांच्याकडे असे. जमीनदारी पद्धतीच्या लयानंतर महाराष्ट्रातील खेड्यांतील गावकामगार आणि पाटील यांच्या कामांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार तालुक्याच्या मामलेदाराकडे दिले गेले. एखाद्या विभागात गुन्हे वाढल्यास जवळपासच्या किल्ल्यांतून कुमक धाडण्यात येई, आणि त्यासाठी होणारा खर्च प्रजेकडून वसूल केला जात असे. बाजारपेठेत एखाद्या वस्तूचे किंवा अनेक वस्तूचे भाव वाढले अथवा कमी झाले तर त्या वस्तूंची यादी करून सगळे भाव २४ तासांत पेशव्यांकडे पाठवण्याची सगळी जबाबदारी गाव पाटलाकडे दिलेली असायची. मोगल साम्राज्य मोडकळीस आल्यावर मात्र पोलिस यंत्रणा ढासळत गेली. नंतर इंग्रजांचा अंमल सुरू झाला. अगोदर कंपनी सरकारच्या काळात वेगळी व्यवस्था होती. परंतु लॉर्ड कॉर्नवॉलिस गवर्हनर जनरल झाल्यावर त्याने १७३८ मध्ये पोलीस दलाची नवी रचना केली. २० चौरस मैलांच्या टापूसाठी म्हणजेच आजच्या भाषेत ५२ चौरस किलोमीटर्सच्या प्रभागासाठी एक पोलिस ठाणे, दरोगा आणि २०–२५ शिपाई असे पोलिस पथक देण्याची व्यवस्था केली. १८८५ मध्ये मुंबईत पोलिस महानिरीक्षकाची पहिल्यांदा नेमणूक झाली. लॉर्ड कर्झनने १९०२ मध्ये नवा पोलिस आयोग नेमला. त्यानेही पोलीस दलाच्या अधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या श्रेणी ठरविल्या. कामाचे आणि अधिकार वापरण्याचे नियम ठरवून दिले होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातल्या पोलीस खात्यात बरीच सुधारणा झाली. संपूर्ण देशभरासाठी कायदा एकच, कार्य पद्धती एकच झाली. भारतीय पोलीस सेवा असा स्वतंत्र विभाग झाला. त्या विभागाने वेगवेगळ्या प्रांतांमध्ये असलेल्या पोलीस दलातील वरची पदे सांभाळावीत आणि त्या राज्याच्या पोलीस सेवेतील दुय्यम दर्जाचे अधिकारी, शिपाई यांच्यावर नियंत्रण ठेवावे अशी कार्यपद्धती ठरविण्यात आली. एवढे सगळे करीत

असताना शहरी भागांबरोबरच ग्रामीण भागातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी, गुन्हेगारीला आळा घातला जावा म्हणून राज्य शासनाच्या पोलीस दलातील अधिकाऱ्यांना माहिती देण्यासाठी प्रत्येक गावातील पाटील असलेल्या ग्रामप्रमुखाकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्याच कार्यपद्धतील असा कालांतराने थोडा थोडा बदल होत गेला.

गावाच्या संरक्षणाची जबाबदारी इतिहासातील काळापासून पोलीस पाटलावर आहे. फार पूर्वी पोलीस पाटील म्हणजे गावातील सर्वेसर्वा असायचा. त्याच्या सत्तेला निर्बंध नव्हते. स्वातंत्र्यानंतर लोकशाही राज्यव्यवस्था अस्तित्वात आल्यावर जे कायदे अस्तित्वात आले, त्या कायद्यानुसार पोलीस पाटलांना जरूरी पुरतेच अधिकार देण्यात आले. इंग्रजांच्या काळात सर्वात पहिल्यांदा पोलीस पाटलांच्या कामकाजासंबंधीच्या नियमांना निश्चित स्वरूप देण्यात आले. त्यालाच कायदा म्हटले गेले. १८६७ मध्ये प्रथम **गावचा पोलीस कायदा** बनविण्यात आला. त्यानुसारच गाव पोलिसांचे अधिकार निश्चित करण्यात आले. पोलीस पाटलांची कामे आणि वतन या बद्दलची प्रथा मात्र कायद्यात सुधारणा जरी अनेकदा झाल्या असल्या तरी कायद्याचे मूळ स्वरूप बदलले नाही. पूर्वी पोलीस पाटील वतनदार वंशातलाच असायचा. परंतु १९६७ च्या कायद्यानुसार आता पोलीस पाटील राज्य शासनाचा पगारदार कर्मचारी झाला आहे.

**पोलीस पाटील कायदा:-** या कायद्याची सर्वात अगोदर १८६७ मध्ये इंग्रजांच्या सरकारने मांडणी केली होती. शंभर वर्षांनंतर १९६७ मध्ये महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम अद्ययावत सुधारणांसह तयार करण्यात आला. पोलीस पाटलाच्या कायद्याची एकूण १८ कलमे आहेत. मूळ १९६८ चा कायदा क्रमांक ४६ असा हा कायदा आहे.

**कलम १:-** या अधिनियमाला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९६७ असे संबोधले जाते. हा अधिनियम राज्याची राजधानी असलेल्या बृहन्मुंबई शहरास लागू होत नाही. मुंबई वगळता हा अधिनियम संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल. राज्य शासनाने राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून हा अधिनियम अमलात आणला.

**कलम २:-** पोलीस ठाण्याचे अधिकारी म्हणजे सबइन्स्पेक्टर, उपनिरीक्षक, फौजदार यांच्या स्वाधीन पोलीस ठाणे सोपविलेले असते. क्रिमिनल प्रोसिजर कोडमध्ये दिलेल्या व्याख्येत असेही नमूद करण्यात आलेले आहे की फौजदार जेव्हा पोलीस ठाण्यात नसेल तेव्हा तेथे प्रभारी असलेल्या जमादारास तेथील अधिकार प्राप्त झालेले असतात.

**कलम ३:-** जिल्ह्यात ग्राम पोलिसांच्या प्रशासनाची व्यवस्था करण्याचे काम जिल्हाधिकारी, जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून चालविण्यात येईल जिल्हाधिकाऱ्यासच पोलीस पाटलाची नेमणूक करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील उपविभागाच्या सहायक जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार असलेल्या तालुका दंडाधिकाऱ्याकडे पोलीस पाटलांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांनीच प्रदान केलेले असतात.

**कलम ४:-** जिल्हा दंडाधिकाऱ्यास पोलीस प्रयोजनासाठी, कोणत्याही ग्राम पोलीस अधिकाऱ्यावर ज्या कोणत्याही प्राधिकार त्याने आयुक्तांच्या मंजुरीने, पोलीस अधीक्षकाकडे किंवा यथास्थिती पोलीस आयुक्ताकडे प्रतिनियुक्ती करणे कायदेशीर असते.

प्रत्येक गावासाठी एक पोलीस पाटील असे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. पोलीस पाटलाची नेमणूक सरकार करणार असे जरी म्हटले आहे

तरी सरकार या संबंधीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याकडे सोपवू शकतात. जिल्ह्याच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यासही पोलीस कारणापुरता नियंत्रणाधिकार देता येतो.

पोलीस पाटील गावचा पोलीस अंमलदार होय. पोलिसांचे प्रयोजन याचा अर्थ आरोग्य संरक्षण सुस्थितीविषयक व्यवस्थेचे बंदोबस्तीचे काम होय. त्यासाठी जिल्हाधिकारी पोलीस पाटलाची नेमणूक करणार असले तरी त्यांना पोलीस प्रयोजनासाठी पोलीस अधिकाऱ्यास नियंत्रणाचे अधिकार देता येतात.

गावच्या पोलीस नियंत्रणाचा सर्वात श्रेष्ठ अधिकारी विभागीय आयुक्त, या खालोखाल जिल्हाधिकारी आणि त्या खालोखाल उपविभागीय मुलकी अधिकारी असतो. मुलकी अधिकाऱ्यांच्या दर्जाप्रमाणे दंड प्रक्रिया संहितेनुसार दंडाधिकाऱ्यांचे अधिकार दिलेले असतात. पोलीस पाटलांचा वेळोवेळी तात्कालिक कामांसाठी संबंध मात्र अगोदर तहसीलदाराशीच येत असतो.

**कलम ५:-** सुरूवातीला कायदा अस्तित्वात आला तेव्हा पोलीस पाटलांची नेमणूक जिल्हाधिकारी करतील. प्रत्येक गावाला एक पोलीस पाटील नेमण्यात येईल आणि त्याला पारिश्रमिक दरमहा ३००/- रू देण्यात येईल असे ठरविण्यात आले होते. गावातील कोतवाल पोलीस पाटलाच्या हाताखाली काम करतील. पहिल्यांदा पोलीस पाटलाची नेमणूक पाच वर्षांसाठी केली जाईल आणि समाधानकारक काम दिसल्यास आणखी पाच वर्षे मुदत वाढविली जाईल. पोलीस पाटील म्हणून काम करत असताना वर्षातून काही दिवसांची किरकोळ रजा घेता येईल. परंतु एका वेळेस सलग तीन दिवसांपेक्षा अधिक काळ रजा घेता येणार नाही. बिनपगारी रजा मिळेल परंतु सहा महिन्यांपेक्षा जास्त दिवस बिनपगारी राहता येणार नाही.

**कलम ६:-** जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे पोलीस पाटलांना कर्तव्य चोखपणे बजवायचे असते.

पोलीस पाटलाने आपल्या गावातील अपराधांचे प्रमाण आणि ग्राम पोलिसांशी संबंधित सर्व गोष्टीविषयीची माहिती गावातील सामाजिक स्वास्थ्य आणि स्थानिक परिस्थिती या बद्दलची माहिती कार्यकारी दंडधिकाऱ्याला नियमितपणे कळवायला पाहिजे.

कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मदत पाहिजे असल्यास किंवा कायदा सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने मदत पाहिजे असल्यास पोलीस पाटलाने सर्व प्रकाराने सहकार्य दिले पाहिजे. शासनाचे काम म्हणून जेजे करण्याचे आदेश असतील ते काम करायला पाहिजे.

शांतता सलोखा टिकविण्यासाठी, कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सतर्क राहिले पाहिजे. परिस्थिती बिघडेल अशी काही माहिती मिळाली तर लगेच गुप्त माहिती ठाणे अधिकाऱ्यास कळविली पाहिजे.

पोलीस पाटलाला नेहमी जागृत राहिले पाहिजे. गावाच्या हद्दीत गुन्हा घडू नये याची काळजी घेत असतांना बंदोबस्त करण्याची जबाबदारी पोलीस पाटलाची आहे. नजीकच्या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याची परिस्थिती अवगत करून देण्यासाठी यांच्याशी नियमितपणे संपर्क ठेवला पाहिजे. आपल्या गावाच्या हद्दीतील गुन्हेगाराचा शोध करणे आणि ठाणे अधिकाऱ्यास माहिती देऊन त्या गुन्हेगाराला न्यायालयात धाडणे यासाठी जेवढे आवश्यक आहे तेवढे काम करण्याची जबाबदारी पोलीस पाटलांची असते. पोलीस पाटील शासनाचा प्रतिनिधी आहे त्याला कायदा राखण्यासाठी गावचा प्रमुख म्हणून नेमलेले असते. तो शासनाचा सेवक आणि गावाचाही सेवक असतो.

**वरिष्ठांना माहिती देणे :-** गावात खून झाला, मारामारी होऊन त्यात कोणाचा प्राण गेला, गावात दरोडा पडला, चोरी झाली तर त्या घटनेची खबर तात्काळ नजीकच्या पोलीस आणि वरच्या अधिकाऱ्यास कळविली पाहिजे.

गावात कोणी आगळीक केली, जळीत झाले, कोणास जिवंत जाळण्याचा प्रकार घटला किंवा प्रयत्न झाला, कोणाचे खळे, शेतमाल, मोठा गोदाम घर जळाले किंचा कोणी जाळले तर तात्काळ माहिती घेऊन वरिष्ठांस कळविले पाहिजे. गावात बालविवाह झाला, कोणी बेकायदेशीर सावकारी करीत असल्याचे कळले. मालमत्तेच्या मालकीवरून किंवा भाऊबंदकीतून मारामारी झाली. हातभट्टीच्या दारूचा धंदा कोणी केला किंवा मटका, जुगार चालविण्यात असल्याचे आढळले तर त्याची संपूर्ण माहिती गुप्तपणे वरिष्ठांना कळविली पाहिजे. पोलीस पाटलाने आणखीही अनेक बाबतीत लक्ष दिले पाहिजे. कोणी बेकायदेशीरपणे हत्यार म्हणजे बंदूक, पिस्तुल बाळगत असेल, कोणी तलवार, गुप्तीसारखी प्राणघातक हत्यारे बाळगत असले तर त्याची माहिती ठाणे अधिकाऱ्यास दिली पाहिजे. जंगल विषयक कायदा, कोंडवाड्याचा कायदा याची माहिती घेऊन कायद्याच्या उल्लंघनाचे प्रकार उघडकीस आल्या क्षणी त्याची वरिष्ठांना माहिती दिली पाहिजे.

**कलम ७:-** पोलीस पाटलास जी काम करायची असतात आणि कर्तव्ये बजावावयाची असतात त्या कामासाठी ग्रामसेवकाकडून साहाय्य मिळणे अपेक्षित आहे आणि ते साहाय्य त्याने केले पाहिजे. यासाठी त्यास भाग पाडता येईल. उदाहरणार्थ पोलीस पाटलांसाठी सर्व लेखी पत्रके आणि कामकाजाची कागदपत्रे तयार करून देण्याचे काम तलाठ्याने केले पाहिजे. ते त्याचे कर्तव्य ठरले. पोलीस पाटील हा गावचा फौजदारी अंमलदार आहे आणि त्याचे लेखनिक काम मुलकी अंमलदाराने म्हणजे तलाठ्याने केलेच पाहिजे.

**कलम ८:-** गावातील शांततेचा भंग करण्याचे प्रकार घडतात. गावात कोणत्याही वेळी कशावरूनही भांडण तंटा होऊ शकतो. कोणत्याही कारणाने लूटमार होऊ शकते. समाजास हानी पोहचविणारी कृत्ये घडतात. त्यामुळे शांतता, सलोखा बिघडून कायदा-सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होतो. परंतु पोलीस पाटलाने नेहमी सतर्क राहून असे घडू न देण्याकडे लक्ष दिले पाहिजे. बंदोबस्ताच्या काम ग्रामसेवक व इतर वर्गास कोणी जर नकार दिला किंवा गैरवर्तन केले तर त्यांच्याविरूद्ध कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे प्रतिवृत्त पाठविण्याचा अधिकार पोलीस पाटलास आहे.

ग्रामपंचायत कायद्याच्या कलम ४५ अन्वये ग्रामरक्षक दलाची स्थापना करणे हे काम ग्रामपंचायतीचे आहे. त्यास मदत करणे हे पोलीस पाटलाचे काम आहे.

**कलम ९:-** कोणत्याही पोलीस पाटलाने आपली कर्तव्ये पार पाडण्यात दुर्लक्ष केल्यास, किंवा हयगय केल्यास अथवा कोणतेही गैरवर्तन केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळल्यास तो पुढील शास्तींना पात्र ठरेल.

अ) निंदा केल्यास किंवा

ब) सरकारला पोहोचलेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची किंवा नुकसानीच्या भागाची वसुल., पोलीस पाटलाच्या पारिश्रमिकातून केली जाईल.

क) पोलीस पाटलाच्या पारिश्रमिकाएवढा किंवा अधिक दंड केला जाईल.

ड) त्यास निलंबित केले जाईल.

इ) किंवा त्यास नोकरीतून काढून टाकले जाईल.

फ) किंवा कोणत्याही सरकारी सेवेत तो कधीही पात्र ठरणार नाही.

अशा शास्तीचे अधिकार तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्यास देण्यात आले आहेत. नोकरीतून कमी करणे किंवा नेहमीसाठी बडतर्फ करणे, शास्ती लावण्याचे अधिकार उपविभागीय श्रेणीच्या अधिकाऱ्यास आहेत.

**कलम १०:-** कोणत्याही पोलीस पाटलावर कोणत्याही प्रकारचा अपराध केल्याचा आरोप ठेवण्यास आल्यास त्या अपराधाबद्दल त्याच्यावर फौजदारी खटला दाखल केला जाईल आणि अगोदर दिलेल्या कलमातील कोणत्याही उपबंधामुळे खटला चालविण्यास बाधा येणार नाही.

कलम ९ मध्ये असा कोणत्याही प्रतिबंधाचा उल्लेख नाही. उलट असा खटला दाखल करता येईल असे स्पष्टीकरणच कलम १० मध्ये देण्यात आलेले आहे.

**कलम ११:-** कोणत्याही पोलीस पाटलाची नेमणूक करण्यास सक्षम असलेला जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी हा पोलीस पाटलाच्या विरूद्धच्या फौजदारी खटल्याची न्याय चौकशी होईपर्यंत पोलीस पाटलास निलंबित करू शकतो.

**कलम १२:-** गावातील गुन्हेगार पळून गेला असेल किंवा त्याचा ठावठिकाणा माहीत नसेल तर पोलीस पाटलाने त्या संबंधीची माहिती ठाणे अधिकाऱ्याला विनाविलंब पाठविली पाहिजे. त्या नंतर पोलीस पाटलाने गावात चौकशी करून गुन्हा कसा घडला, केव्हा घडला याची बारीक माहिती मिळवावी आणि स्वत: चौकशीचे प्राथमिक काम सुरू करावे. जे काही पुरावे मिळतील, जे कोणी साक्षीदार असू शकतील त्या बद्दलची माहिती मिळवून ठाणे अधिकाऱ्यास कळविली पाहिजे. पोलीस अधिकारी जेव्हा तपास कामाला येतील तेव्हा त्यांना सहकार्य केले पाहिजे.

**गुन्ह्याची वर्दी :-** कोणताही गुन्हा घडल्यास पोलीस पाटलाने गुन्ह्याची वर्दी लेखी स्वरूपात तात्काळ त्याच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे. हा लेखी मजकूर फार महत्त्वाचा असतो.न्यायालयात जेंव्हा त्या गुन्ह्याचे प्रकरण सादर होत असते, त्यावेळी पोलीस पाटलाने गुन्ह्याच्या वर्दीसंबंधी दिलेला लेखी मजकूर पुराव्यांसाठी सादर करावयाचा असतो. जर तो मसुदा दोषपूर्ण असेल तर त्यामुळे संशय उत्पन्न होतो आणि निर्माण झालेल्या संशयाचा फायदा आरोपीस मिळतो. एरव्ही ज्याला शिक्षा झाली, त्याची सुटका होते, गुन्ह्याच्या वर्दीचा लेखी मजकूर सदोष असल्याने ते घडलेले आहे असे समजण्यात येते. त्याबद्दल पोलीस पाटलास जबाबदार धरता येते.

**झडती घेण्याचा अधिकार :-** एखाद्या गुन्ह्याला कारणीभूत ठरलेल्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी गुन्ह्याशी संबंधित वस्तू, जिनसा, हत्यारे जर गुन्हेगाराने लपविल्यास संशय येत असेल तर पोलीस पाटील घराची किंवा कोणत्याही ठिकाणच्या सामानाची झडती घेऊ शकतो. घरफोडी करताना वापरली जाणारी अवजारे, हत्यारे किंवा खून, मारामारी झाली असल्यास त्या गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे किंवा अन्य वस्तू, रक्ताने माखलेले कपडे वगैरे काही देखील गुन्ह्याच्या पुराव्यांसाठी उपयोगाचे असते. त्यासाठी पोलीस पाटील झडती घेऊ शकतो.

दंड प्रक्रिया संहितेच्या कलम ४५ मधील तरतुदीनुसार गावात घडलेल्या गुन्ह्याचे प्रतिवृत्त ठाणे अंमलदाराने करावयाचे असते.

**कलम१३:-** कोणत्याही गावात किंवा गावाच्या हद्दीत एखादा अनैसर्गिक मृत्यू झाला किंवा आकस्मिक मृत्यू झाल्यास अथवा गावाच्या हद्दीत कोठेही प्रेत आढळले तर पोलीस पाटलाने तात्काळ ठाण्याच्या अधिकाऱ्याला माहिती तर कळविली पाहिजेच, शिवाय स्वत: पोलीस

पाटलाने घटनास्थळी गेले पाहिजे. तेथे विचारपूस करावी. दोन चार जाणत्या इसमांना बोलवावे. त्यांच्याकडून माहिती घेऊन मृत्यूचे कारण, परिस्थिती याबद्दल प्रतिवृत्त तयार केले जाईल. ते ठाणे अधिकाऱ्यास पाठवण्याचे काम पोलीस पाटलाने करावे.

असा तपास करण्यासाठी ज्या कोणत्याही इसमास पोलीस पाटील सांगत असेल आणि तो इसम जर समर्थनीय कारणाविना ते काम करण्यास इन्कार करीत असेल, किंवा हयगय करत असेल तर त्याचा दोष असल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याला पन्नास रूपये दंड ठोठावण्यात येईल.

तपासाच्या निष्कर्षांवरून जर असे आढळले की तो मृत्यू अनैसर्गिकरीत्या घडला आहे तर पोलीस पाटलाने ठाणे अधिकाऱ्याला त्या बद्दलची सूचना पाठविली पाहिजे. प्रेत कुजून जाण्याचा धोका असतो. तेव्हा तो जवळच्या शल्यचिकित्सकाकडे, वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे. मृत्यूच्या कारणांची निश्चित माहिती मिळवण्याचा प्रयत्न वैद्यकीय अधिकारी करील. परंतु अनेकदा प्रेत कुजण्याची, सडण्याची शक्यता असते. कधी कधी कुजलेल्या स्थितीतच प्रेत आढळते. तेव्हा त्या प्रेताची विल्हेवाट लावायला पाहिजे हे जरी खरे असले तरीही जो पर्यंत ठाणे अधिकारी किंवा दंडाधिकारी परवानगी देत नाही तोपर्यंत त्या प्रेताचे दहन करण्याला अथवा दफन करण्याला प्रतिबंध करणे हे पोलीस पाटलाचे काम आहे.

अनैसर्गिकरीत्या मृत्यू झाला म्हणजे नेमके काय समजावे, याचे उत्तर जेव्हा एखाद्या व्यक्तीचा खून होतो, किंवा त्याने आत्महत्या केली आहे असे दिसते, भासते, वाटते किंवा मृत्यू अनैसर्गिक रीतीने झाला असे समजले जाईल. आकस्मिक मृत्यू झाला असेल असे कधी दिसते किंवा तसे दाखवले जाते. एखादा इसम किंवा महिला पाय घसरून विहिरीत पडल्याने मरण आले असेल किंवा नदी–ओढ्याच्या पुरात वाहून गेल्यामुळे मरण आले असेल तरी प्रथमदर्शनीच तो आकस्मिक मृत्यू असल्याचे म्हणता येत नाही. एखाद्या वेळी खून करूनही प्रेत विहिरीत किंवा पुरात

टाकलेले असू शकते अथवा खरोखरच पाय घसरून ती व्यक्ती पडलेली असू शकते. परंतु तरी सुद्धा प्रेताची तपासणी होऊन निष्कर्ष कळेपर्यंत निश्चित मत देता येत नसते. तेव्हा घटनास्थळी पंचनामा करावा. दोन इसमांना बोलावून त्यांच्या समक्ष प्रेताचा पंचनामा बनविलेला असावा. त्या पंचनाम्यावर सह्या करून तो मजकुराचा कागद वरिष्ठांकडे पाठवावा. त्या पंचनाम्याला इन्कवेस्ट पंचनामा म्हणतात. हे काम पोलीस पाटील करतो. त्यास मदत करण्याचे कोणी नाकारले तर गुन्हा ठरतो. अशा एकंदर प्रकरणात प्रेत उत्तरीय तपासणी करूनच नातेवाईकांच्या ताब्यात द्यावे. कोणत्याही प्रेताची तपासणी झाल्याशिवाय ते प्रेत दहनासाठी देता येत नसते. प्रेताची विल्हेवाट लावल्यानंतर त्या व्यक्तीच्या निधनाचा पुरावाच नष्ट होत असतो. म्हणून उत्तरीय तपासणी करणे आवश्यक आहे.

**कलम १४:–** कोणत्याही स्वरूपाचा गंभीर गुन्हा घडल्यानंतर त्या संदर्भात प्राथमिक चौकशी करत असतांना तो गुन्हा करणारा एक माणूस, एक किंवा अधिक माणसे किंवा एक स्त्री अथवा अनेक स्त्रियांबद्दल पोलीस पाटलास संशय जरी आला तरी, त्या लोकांना पकडण्याचा अधिकार पोलीस पाटलास आहे. पुरावा म्हणून उपयोगी पडतील अशा ज्या वस्तू वाटतील त्या वस्तूंचा ताबा मिळवण्यासाठी झडती घेण्याचा तसेच मृत्यूची कारणे ज्ञात असली तरीही पुराव्यांसाठी वस्तू घेऊन संपूर्ण प्रकरण वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठवावे.

अशा रीतीने गुन्हा घडलेल्या ठिकाणी आढळलेली व्यक्ती, गुन्हा करून नामानिराळा राहिलेली संशयित व्यक्ती किंवा ज्याच्याबद्दल शंका येत असेल अशा व्यक्तीला अटक करण्याचा अधिकार पोलीस पाटलास आहे. परंतु अशा वेळी कोणासही २४ तासांपेक्षा अधिक काळ अटकेत ठेवता येत नसते. अटक केलेल्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर उभे केले पाहिजे. अशा स्वरूपाच्या अटकेच्या वेळी अधिपत्र म्हणजेच पकड वॉरंटची

आवश्यकता नसते. अटक करणे सकारण वाटत असेल तरच करावी. निष्कारण अटक करू नये.

**कलम १५:-** पोलीस पाटलास आपल्या कर्तव्यांच्या कक्षेत घेत असेल असा तपास करतांना साक्षीदारांना बोलावून त्यांची तपासणी करण्याचा आणि त्यांच्या निवेदनाची नोंद करण्याचा प्राधिकार असेल. वेळप्रसंगी- सूर्य उगवल्यापासून सूर्य मावळण्याच्या वेळेपर्यंतच्या कोणत्याही राहत्या घराची झडती घेता येईल. मात्र निकडीच्या प्रसंगाखेरीज अन्य वेळी झडती घेऊ नये.ज्या व्यक्तीबद्दल संशय येत असेल तशा संशयित गुन्हेगार इसमाची झडती केव्हाही घेता येईल. त्याने काही लपविण्याचा प्रयत्न केल्यास त्याची झडती तर घेता येईलच शिवाय तो निसटून गेल्यास त्याचा पाठलाग करून पकडणे आणि झडती घेणे हे देखील पोलीस पाटलाच्या प्राधिकारात आहे. संशयित गुन्हेगार पळून दुसऱ्या गावाच्या हद्दीत किंवा गावात गेला तरी तेथपर्यंत पाठलाग करण्याचा, दुसऱ्या गावात जाऊन त्याची झडती घेण्याचाही अधिकार आहे. तथापि त्या बाबतीत दुसऱ्या गावाच्या पोलीस पाटलाने सुद्धा त्याला तेवढ्या कामात सर्व प्रकारचे सहकार्य द्यायला पाहिजे.

एखादा खुनी संशयित इसम आपल्या गावातील एखाद्या घरात घुसला असेल किंवा पळून दुसऱ्या गावात गेला असेल तेथे कोणत्याही घरात घुसला असेल तर अशा वेळी पोलीस पाटील त्या घराची रात्री-दिवसा केव्हाही झडती घेऊन संशयितास अटक करू शकतो. दुसऱ्या गावात असा संशयित गेला असेल तर तेथील पोलीस पाटलाच्या सहकार्याने त्या घराची झडती घेऊन संशयितास अटक करू शकतो.

**कलम १६:-** गावातील कोणतीही मालमत्ता अशी असेल जिच्यावर कोणाचाही हक्क नसेल किंवा कोणीही त्या मालमत्तेवर हक्क संगण्यस येत

नसेल तेव्हा त्या मालमत्तेचा ताबा पोलीस पाटलाने घ्यावा. मात्र पोलीस आयुक्त किंवा अन्य कोणत्याही बाबतीत जवळच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे त्या संदर्भात प्रतिवृत्त पाठवायला पाहिजे आणि ते अधिकारी जो निर्देश देतील त्याप्रमाणे पुढील कारवाई करावी.

पूर्वीच्या काळातच गुरांच्या अतिक्रमणविषयक कायद्याने मुंबई प्रांतातील पोलीस पाटलाकडेच गावाच्या कोंडवाड्याचे काम दिलेले होते. कोंडवाड्यात घातलेल्या किंवा ती अमान्य करण्यात आल्यास त्या गुरांचे काय करायचे? असा प्रश्न आल्यास मुंबई ग्रामपंचायत अधिनियमांतील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

■■■

# पोलीस पाटलाने ठेवण्याची रजिस्टर्स

- गाव महितीचे रजिस्टर
- भटक्या टोळींचे रजिस्टर
- पहिल्या खबरीचे रजिस्टर
- प्रवाशाचे अथवा गावात आलेल्या अपरिचितांची नोंद ठेवण्याचे रजिस्टर
- गुन्ह्यांचे रजिस्टर हिस्ट्री शीट गुन्हेगारांचे रजिस्टर
- अकस्मात प्रकाराचे रजिस्टर, राजकीय हालचालींचे रजिस्टर
- आवाक जावक रजिस्टर, व्हिजिट बुक, टपाल वही

**पोलीस पाटलाचे दप्तर :-**

पोलीस पाटलाच्या अनेक प्रकारची रजिस्टरे आणि नोंदवह्या पाहिजे असतात. त्यातल्या त्यात गाव माहितीचे रजिस्टर पहिल्या खबरीचे रजिस्टर, प्रवाशाचे अथवा गावात आलेल्या अपरिचिताची नोंद असलेले रजिस्टर, गुन्ह्यांचे रजिस्टर, हिस्ट्रीशीट गुन्हेगांरांचे रजिस्टर, अकस्मात प्रकारांचे- अकस्मात मृत्यूचे रजिस्टर, मरणोत्तर चौकशीचे प्रतिवृत्त, व्हिजिट बुक, टपाल वही, आवक जावक रजिस्टर, बेलीफ बुक, राजकीय हालचालींच्या नोंदीचे रजिस्टर इत्यादी आवश्यक असते.

**पहिल्या खबरीचे रजिस्टर :-** पोलीस पाटलाने पोलीस ठाण्याला सर्व गुन्ह्यांचे प्रतित्तृत्त दिले पाहिजे. त्याची नोंद खास रजिस्टरमध्ये लिहिली पाहिजे. त्यालाच पहिल्या खबरीचे रजिस्टर म्हटले जाते. त्या पुस्तकास म्हणजे रजिस्टर बुकात दोन पाने असतात म्हणजे दोन गटाची दोन वेगवेगळी पाने असतात. प्रत्येक गटाचे पहिले पान सहज फाडून घेता येते. त्यासाठी उभ्या रेषेत छिद्रे पाडलेली असतात. त्यामुळे ते पान सहजपणे विलग करता येते. पोलीस ठाण्यात पाठवावयाचा मूळ अहवाल म्हणून त्याचा उपयोग होतो. त्याया खालच्या बाजूला आडव्या रेषेत छिद्रे पाडलेली असतात. पोच

पावती म्हणून तो भाग सहज कापून घेता येतो ठाण्यांतून जेव्हा तो पावतीचा भाग परत पोलीस पाटलाकडे दिला जातो, (पाठविला जातो) तेव्हा पोलीस पाटलाने तो भाग रजिस्टरमधील दुसऱ्या पानास चिकटवून ठेवायचा असतो. रजिस्टरमधील दुसरे पान म्हणजे पोलीस पाटलाच्या प्रतिवृत्ताची कार्यालयीन प्रत (ऑफिस कॉपी) असते. प्रत्येक पानाच्या जावक प्रतीवर आणि पोच पावतीवर जो नंबर असेल तोच राहील. ज्या ठिकाणी प्रश्नाचे उत्तर लिहिलेले नसते. त्या ठिकाणी पोलीस पाटलाने त्याच्यासमोर कोरा (ब्लँक) असा शब्द लिहिला पाहिजे.

**गुन्ह्याचा रिपोर्ट करताना:-** गुन्ह्याचा रिपोर्ट करताना नमुन्यांचा पुढील बाजूवरील असलेल्या प्रकरणांच्या रिपोर्टखेरीज आणखी प्रश्नपत्रिकेत छापलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यावेळी जेवढे शक्य असेल तेवढे फार काळजीपूर्वक आणि बिनचूक दिले पाहिजे. त्या रिपोर्टात कोणते दस्तऐवज जोडलेले असल्यास त्याची आणि जप्त केलेल्या वस्तूंची स्पष्ट नोंद केलेली पाहिजे. दस्तऐवज कोणते असतील त्याबद्दल ढोबळमानाने लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे पंचनामा, मृत्यूसमयीचा जबाब अशी कागदपत्रे असतात. धरलेल्या वस्तू म्हणजे चोरलेली मिळकत, चाकू, कुऱ्हाड, रक्ताने माखलेल्या काठ्या, कपडे, दगड, वांतीचे औषध इत्यादींची नोंद असावी. तसेच कोणकोणाला पकडले त्यांची नावे, तसेच यदाकदाचित त्या पकडलेल्यांची जर इतर माहिती असेल तर तपशील घ्यावा. अशा परिपूर्ण नोंदीच्या पहिल्या खबरीच्या प्रतिवृत्तास - दस्तऐवजास न्यायालयात फार महत्त्व असते. त्यामुळे थोडीशीही चूक होऊ देऊ नये. किंचितही कसूर झाल्यास सबंध प्रकरणाचा बिघाड होण्याचा संभव असतो आणि चुकीचे प्रतिवृत्त दिल्याबद्दल पोलीस पाटलास जबाबदार धरले जाऊ शकते. त्यामुळे प्रत्येक पोलीस पाटलाने हे ध्यानात ठेवले पाहिजे की पहिली खबर विशिष्ट नमुन्यातच पाठविली पाहिजे. पहिली खबर देण्यात हयगय करू नये आणि विलंब लावू नये.

जेव्हा पोलीस पाटलाकडून ठाणे अंमलदारास प्रतिवृत्त मिळते, तेव्हा त्याच्या खालच्या बाजूला असलेला पोच पावतीचा नमुना ताबडतोब भरून *कापून वेगळा, प्रतिवृत्त आणणाऱ्या जासूदासोबत तो भाग पोलीस पाटलाकडे* परत पाठविला जातो. पोलीस पाटलाने त्या पोच पावतीचा भागाचा तुकडा मूळ जावक प्रतीवर विशिष्ट ठिकाणी चिकटवून ठेवला पाहिजे. पोलीस ठाण्याकडून पोच पावती आणि रिपोर्ट मिळाल्यावर त्याची तारीख आणि वेळ त्यावर लिहावी. केव्हांही वेळेची किंवा तारखेची माहिती विचारण्याचे काम पडू शकते. जेव्हा पोलीस पाटील गावाबाहेर किंवा रजेवर जाईल तेव्हा पहिल्या खबरीचे रजिस्टर मामलेदाराच्या म्हणजे तहसीलदाराच्या हुकुमाप्रमाणे एखाद्या इसमाकडे सोपविले पाहिजे आणि जो पर्यंत पोलीस पाटील गैरहजर असेल तोपर्यंत त्या इसमाने आवश्यक ते सर्व अहवाल सादर केले पाहिजेत. पोलीस पाटलाच्या किंवा पोलीस पाटील गैरहजर असलेल्या मुदतीत त्याच्याकडे रजिस्टर सोपविलेले असेल त्या इसमाच्या ताब्यातून पहिल्या खबरेचे रजिस्टर कधीही बाहेर जाता कामा नये.

ज्या गावाच्या पोलीस पाटील काम पाहत असेल त्याने त्याच्या कार्यक्षेत्राशी संबंधित ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षकाकडून पहिल्या खबरीचे रजिस्टर, मागणी नोंदवून, अर्ज करून प्राप्त करायचे असते. त्या रजिस्टरच्या प्रत्येक पानावर नमुन्याच्या १ आणि २ भागात जिल्हा पोलीस अधिक्षकांनी प्रत्येक रजिस्टरमधील पानांच्या संख्येबद्दल दाखला दिला पाहिजे.

तालुका मॅजिस्ट्रेट आणि पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक यांनी पहिल्या खबरीचे रजिस्टर वारंवार तपासणे त्यांचे कर्तव्य असते आणि या बाबतीत कोणत्याही हयगयीबद्दल त्यांनाच जबाबदार धरले जाते. उपविभागीय अधिकाऱ्यांनी देखील ते अधून मधून तपासावे असे अपेक्षित आहे. मात्र त्यांनी नाही तपासले तरी हरकत नसते. तालुका मॅजिस्ट्रेट आणि पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षकाचे ते कामच आहे.

**पहिल्या खबरीचा अहवाल:-** कोणत्याही गावात अगर गावाच्या हद्दीत

कोणत्याही प्रकारचा गुन्हा घडल्यास त्याची पहिली खबर नजीकच्या पोलीस ठाण्याला पाठवलीच पाहिजे. त्या पहिल्या खबरीच्या अहवालात बराच तपशील असतो. परंतु खाली दर्शविलेली माहिती मात्र अत्यंत आवश्यक असते.

१. गावाचे नाव
२. गुन्हेगाराचे नाव आणि त्याचा पत्ता
३. गुन्हा जेथे घडला असेल ते ठिकाण
४. गुन्ह्याचे स्वरूप
५. फिर्यादीचे नाव आणि पत्ता
६. गुन्ह्याची तारीख आणि वेळ
७. गुन्ह्याचे कारण
८. साक्षीदारांची नावे आणि पत्ता
९. गुन्ह्यासाठी वापरलेल्या साधनांचा, हत्यारांचा तपशील
१०. गुन्ह्याचे परिणाम

घडलेल्या गुन्ह्यामुळे शांतता भंग किंवा कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असली तर त्या बाबतचा अहवाल तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार यांना सादर करणे पोलीस पाटलावर बंधनकारक असते. पोलीस ठाण्याला पहिल्या खबरीचे प्रतिवृत्त दिले जाते. तेवढ्याच तत्परतेने तालुका दंडाधिकाऱ्यांकडेही अहवाल पाठवलाच पाहिजे. गुन्हेगार माहीत झाला असेल आणि तो पळून गेला असेल अथवा गुन्हेगार अज्ञान असेल तरी सर्व तपाशील जवळच्या पोलीस ठाण्यात पाठविला पाहिजे. पहिल्या खबरीच्या बाबतीत एवढे करणे फार आवश्यक असते.

## पोलीस पाटलाने ठेवण्याची रजिस्टर्स:–

**१. गाव माहितीचे रजिस्टर–** यामध्ये गावाची लोकसंख्या, गावात कोणकोणत्या जातीचे आणि ते किती लोक राहतात, गावातली देवस्थाने मंदिरे, मशीद, चर्च असल्यास त्याची माहिती असावी. प्रत्येक गावात

वर्षभरात कोणतेही उत्सव असतात त्याबद्दलची माहिती रजिस्टरमध्ये असावी.

**२. भटक्या टोळीचे रजिस्टर–** बाहेरच्या गावांतून अथवा शेजारच्या जिल्ह्यांतून अथवा कोठूनही लोक भीक मागण्यासाठी गावात येतात, त्यांची संख्या किती, कोणते भिकारी आहेत, फकीर बैरागी आहेत किंवा कसे भीक मागणारे आहेत त्यांची माहिती घेणे. त्या माहितीची रजिस्टरमध्ये नोंद करणे हे पोलीस पाटलांचे काम आहे.

**३. आवक जावक रजिस्टर–** पोलीस पाटलाकडे आलेली प्रकरणे आणि त्याने वरिष्ठांकडे पाठविलेली प्रकरणे या बद्दलची व्यवस्थित नोंद या रजिस्टमध्ये असली पाहिजे.

**४. व्हिजिट बुक–** गावात कामासाठी सरकारी अधिकारी येत असतात, निमसरकारी अधिकारीही येतात त्यांची नोंद व रजिस्टरमध्ये असली पाहिजे. त्या नोंदीवर सदरहू अधिकाऱ्याचा शेरा घेतला पाहिजे.

**५. हिस्ट्रीशीटर–** गुन्हेगारांचे रजिस्टर गावात काही सराईत गुन्हेगार असतात, तर काही गुन्हेगार गावातले नसूनही वारंवार गुन्हे करण्यासाठी गावात येत असतात. अशा हिस्ट्री शीटर गुन्हेगारांची माहिती मिळवून या रजिस्टरमध्ये त्यांची नोंद केली पाहिजे.

**६. गावात घडलेल्या गुन्ह्यांचे रजिस्टर–** गावात घडलेले गुन्हे कोणकोणते आणि त्यावर पुढे काय कारवाई झाली याची माहिती या रजिस्टरमध्ये असली पाहिजे. पोलीस ठाण्यातून तपाशील मिळवून त्याचीही नोंद केली पाहिजे.

**७. हजेरी रजिस्टर**– पोलीस पाटील आणि कोतवालाच्या हजेरीची नोंद या रजिस्टरमध्ये नियमितपणे केलेली पाहिजे.

**८. अकस्मात प्रकारांचे रजिस्टर**– (अ) अकस्मात आग लागून ज्याचे नुकसान झाले असेल त्या संबंधी पाठविलेल्या अहवालातील तपशिलाची नोंद या रजिस्टमध्ये करावी. त्यावर पुढे काही कारवाई झाली असेल त्याचीही नोंद केली पाहिजे. (ब) अकस्मात मृत्यूचीही घटना घडू शकते, त्याबद्दलसुद्धा ठाण्यात अहवाल पाठविला पाहिजे आणि त्यांची नोंद अकस्मात प्रकारांच्या रजिस्टरमध्ये केली पाहिजे.

**९. टपाल वही** – पोलीस पाटलाकडून जे टपाल पाठविले जाईल त्याची नोंद सदरच्या वहीमध्ये केली पाहिजे. संबंधिताची सही त्यावर घेतली पाहिजे.

**१०. गावातील राजकीय हालचालीचे रजिस्टर** – गावात कोणकोणत्या राजकीय पक्षांचे लोक राहतात, त्यांचे कार्यकर्ते आणि पुढारी कोण आहेत, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती वगैरेंवर कोणी निवडून गेले असल्यास त्या व्यक्तींची नोंद या रजिस्टरमध्ये असावी. गावातील ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या सदस्यांची नोंद असावी.

**११. पत्रव्यवहाराची फाईल** – पोलीस पाटलास आलेल्या पत्रांची आणि पोलीस पाटलाने पाठविलेल्या पत्रांची फाईल आवश्यकतेनुसार बनवून ठेवण्यात यावी.

या सर्व कामांची काळजी घेऊन पोलीस पाटील आपले कर्तव्य बजावत राहिल्यास त्याची प्रतिमा निश्चितच उंचावेल आणि गुन्हेगारीला आळा बसून कायदा–सुव्यवस्था राखण्याच्या कामी शासनाला आणि पोलीस खात्याला मदत होईल.

**पंचनामा:-** खरे म्हटले तर प्रेताचा पंचनामा हा एकच दसऐवज असा आहे की, तो पंचनामा या संज्ञेस खऱ्या अर्थाने पात्र आहे. कारण त्यात पंचांचे मत नमूद केलेले असते. पोलिसांनी तयार करावयाच्या इतर दस्तऐवजांत पंचांचे मत लिहावयाचे नसते. पोलिसांनी आपल्या सुरक्षेसाठी, खोडसाळपणाच्या आक्षेपापासून बचाव करण्यासाठी आणि घटनेसंबंधी हकिकत घडल्यापासून बऱ्याच कालावधीनंतर कोर्टात साक्ष देण्याचा प्रसंग पडतो, तेव्हा त्या घटनेतील प्रत्येक गोष्ट आठवली पाहिजे म्हणून पंचनामा करणे आवश्यक आहे.

**पंचनाम्यांचे प्रकार :-** १. जुगाराच्या किंवा काळ्या बाजाराच्या किंवा दारूच्या विक्रीच्या प्रकरणी धाड घालताना पैसे देऊन बनावट ग्राहकास - खबऱ्यास जेव्हा पाठवण्यात येते तेव्हांचा पंचनामा.

२. घटनास्थळाचा पंचनामा

३. मृत शरीराचा ताबा घेतानाचा पंचनामा

४. तपासण्यासाठी अक्षर -हस्ताक्षर घेतानाचा पंचनामा

५. ओळख परेड करतानाचा पंचनामा

असे वेगवेगळ्या वेळचे पंचनामे असतात. या पंचनाम्यासाठी पोलीस पाटलाने पंच म्हणून ज्या व्यक्तींना बोलवावयाचे असते त्यावेळी नियमांना धरूनच पंच बोलावले पाहिजेत.

**पंच बोलावण्याचा अधिकार:-**

१. कोणत्याही जागेची क्रिमिनल प्रोसिजर कोड - व्याख्या कलम २(पा) प्रमाणे (जागा म्हणजे घर, इमारत, तंबू वाहन) झडती घेण्याकरिता कलम १०० (४) प्रमाणे पंचांना बोलावण्याचा पोलिसांना अधिकार आहे आणि जर या कलमाने बोलविल्यावरून पंच हजर राहणार नाही तर तो कलम १००(८) अन्वये - भा.दं.वि. कलम १८७ चा अपराध ठरतो.

२. मृत शरीराचा पंचनामा करण्याकरिता कलम १७५ (१) अन्वये

पंचांना बोलावण्याचा अधिकार पोलिसांना आहे. आणि असे समन्स मिळाल्या नंतरही पंच हजर होणार नाहीत तर तो भा.दं.वि.च्या कलम १७४ चा अपराध होतो.

**पंच कसे निवडावेत:-**

१. पंच हुशार, अब्रुदार, बोलका, निःस्वार्थी, निःपक्षपाती, सुशिक्षित असावा.
२. पूर्वी शिक्षा भोगलेला इसम पंच म्हणून घेऊ नये, तो कसल्याही पोलीस प्रकरणात गुंतलेला नसावा.
३. धर्माने, शारीरिक पीडेने, व्यंगाने आक्षेपार्ह पंच नसावा.
४. घडलेल्या गुन्ह्याशी किंवा घटनेशी संबंध असणारा इसम पंच नसावा.
५. स्त्रियांची झडती घेताना स्त्री पंचांनाच बोलवावे, निदान एक तरी स्त्री पंच असावी.
६. पंचांची संख्या २ ते ५ असावी.
७. पंच म्हणून काम करण्यास राजी नसेल तर त्या व्यक्तीला बोलावू नये.
८. पंचनामा जेथे करावयाचा असेल तेथे आसपास राहणारी व्यक्तीच पंच म्हणून बोलवावी.
९. धंदेवाईक पंच घेऊ नयेत.
१०. ज्या वस्तूचा पंचनामा करावयाचा असेल त्या वस्तुची पारख असलेल्या व्यक्तीलाच पंच म्हणून बोलवावे.
११. ज्याच्या जागेच पंचनामा करायचा असेल त्या घराच्या-जागेच्या मालकाशी शत्रुत्व असलेल्या व्यक्तीला किंवा घनिष्ठ मैत्री असलेल्या व्यक्तीला पंचनामा करते वेळी पंच म्हणून बोलावू नये.

**पंचनामा तपासणी अंमलदाराने लिहावा :-** क्रिमिनल प्रोसिजर कोडअन्वये झडती घेण्याचे किंवा इतर तपासणी कार्यवाही करण्याचे सर्व

अधिकार पोलीस अंमलदारास आहेत. पंचांनी झडतीच्या वेळी स्वत: हजर राहून लक्षपूर्वक झडतीचे काम पाहणे एवढेच त्याचे कर्तव्य आहे. अशा परिस्थितीत सध्या पंचनामे पंचाकडून लिहिण्याचा जो प्रकार आहे तो कायद्याला धरून नाही. पोलीस अंमलदाराने पंचनामा स्वत: लिहावा आणि त्यातील मजकूरसुद्धा अंमलदाराने स्वत: लिहिला आहे असे दर्शविणारा असावा परंतु पंचांच्या समक्ष लिहिलेला असावा हे त्यात महत्त्वाचे आहे. पंचनामा लिहून झाल्यावर त्या पंचांनी तो वाचून पाहिला पाहिजे.

**आत्महत्या खून किंवा अपघाती मृत्यू घडल्यास पोलीस पाटलाने काय करायला हवे? :-** फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १७४ कलमाशी संबंधित मुद्दे येथे विचारात घ्यावयाचे आहेत. आत्महत्या, खून किंवा अपघती मरण अशा स्वरूपाची एखादी घटना घडली असेल तर १७४ कलमानुसार त्या संबंधी अहवाल आणि पंचनामा करण्याची पहिल्यांदा कारवाई झाली पाहिजे. पंचनाम्यासाठी दोन व्यक्तींना बोलवण्याचा अधिकार पोलीस पाटलास आहे (कलम १७५)

मरणोत्तर चौकशीसंबंधी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (म्हणजेच क्रिमिनल प्रोसिजर कोडमधील) कलम १७४ मध्ये कार्यवाहीचा तपशील दिला आहे.

जेव्हा खबर मिळेल की...

अ) कोणत्या एका माणसाने /स्त्रीने आत्महत्या केली आहे. किंवा

ब) एखाद्या मनुषयास दुसऱ्या मनुष्याने ठार मारले असेल, किंवा त्याला एखाद्या जनावराने ठार मारले असेल, किंवा एखादी व्यक्ती यंत्राने अथवा विजेच्या धक्क्याने अथवा अन्य एखाद्या अपघाताने मरण पावली असेल तेव्हा खबर मिळताच पोलीस पाटलाने, (मरणोत्तर चौकशी करण्याचा अधिकार असलेल्या) मॅजिस्ट्रेटला तात्काळ बातमी दिली पाहिजे. महाराष्ट्र ग्राम पोलीस कायद्याच्या कलम १३ अन्वये विहित केल्या प्रमाणे नमुना एम –६१ मध्ये पंचनामा तयार करावा.

**इन्कवेस्ट पंचनामा :-** इन्कवेस्ट पंचनामा (मरणोत्तर चौकशी) करताना सुरूवातीला गाव.. तालुका... जिल्हा... येथील पोलीस पाटील... यांनी आज रोजी आढळलेल्या प्रेतासंबंधी मरणोत्तर चौकशी ... दिनांक ... रोजी केलेल्या पंचनाम्याचे.

**प्रतिवृत :-** पंचायत पत्र ज्या व्यक्तीच्या संबंधात केले आहे त्या व्यक्ती नाव............. वय............ व्यवसाय.......................(व्यक्ती पुरूष किंवा स्त्री-मुलगा किंवा मुलगी किंवा तान्हे मुल) या पैकी जे असेल ते लिहावे.

अशी व्यक्ती मृत्यू पावल्याची माहिती कोणी आणली, प्रेत प्रथम कोणाच्या दृष्टीस पडले...

ज्याने माहिती आणली त्या व्यक्तीने काय निवेदन केले?

मृत्यूच्या कारणांबद्दल काही सांगितले काय?

**प्रेत कोणत्या अवस्थेत होते ?:-**

अ) नग्नावस्थेत

ब) कपडे होते का.... कोणकोणते कपडे होते?

क) दागिने होते का?

ड) प्रेत कोठे आढळले?

**प्रेत जेथे आढळले तेथे पाणी असल्यास -**

अ) भरतीचे पाणी येते का?

ब) पाणी किती खोल होते?

क) विहिरीत किंवा तळ्यात प्रेत सापडले का?

ज्या पाण्याच्या साठ्याच्या ठिकाणी प्रेत सापडले असेल त्याच्या काठावर किंवा कठड्यावर रक्ताच्या खुणा दिसल्या का.... त्याचा तपशील लिहावा. प्रेताचे हात तपासून पाहावे. हातात काही धरलेले होते का त्याचा खुलासा करावा आणि पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याच्या ताब्यात ते द्यावे.

**विषप्रयोगाने मृत्यू झाला आहे असा संशय असल्यास–** मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या घरात किंवा जवळच कोणतेही अन्न असेल विशेषतः पीठ, मिठाई, पिण्याचे पदार्थ, तंबाखू, मादक द्रव्य आढळल्यास सीलबंद करावे त्यापूर्वी पंचासमोर ते दाखवून नोंद करून सीलबंद करावे आणि नंतर पोलीस अंमलदाराच्या स्वाधीन करावे.

जर मयत व्यक्ती ओकारी असेल तर अंगावरचा किंवा बिछान्यावरचा भाग किंवा लाकूड किंवा माती जेथे सापडेल ते मोहोरबंद करून पोलीस अंमलदाराच्या स्वाधीन करावे. ओकलेला पदार्थ भांड्यात असल्यास बाटलीत भरून सीलबंद करून ठाणे अंमलदाराच्या स्वाधीन करावे, त्या मयत व्यक्तीला उलटी किंवा जुलाब झाले होते का, जिवंत असेपर्यंत गुंगी होती का, पेटके किंवा आकडी येत होती का, घसा किंवा कातडी चुरचुरत असल्याचे लक्षण होते का... त्या व्यक्तीने जेवण घेणे, पाणी पिणे, औषध घेणे आणि त्यानंतर विषबाधा झाल्याची भावना दिसू लागणे यामध्ये किती वेळ लावला या बद्दल माहिती मिळाल्यास संक्षेपाने द्यावी.

**टांगून घेऊन दम कोंडून मृत्यू आल्यास :–** गळफास घेऊन मृत्यू आल्याचे आढळल्यास फासाची दोरी कापून प्रेत खाली उतरवावे. परंतु त्यापूर्वी चेहऱ्याचा ओठांचा किंवा पापण्यांचा रंग बदललेला आहे किंवा कसे ते पाहावे. त्याचप्रमाणे डोळे बाहेर आलेले आहेत किंवा कसे अथवा जीभ बाहेर आलेली आहे की आत ओढली गेलेली किंवा ओठांच्या मध्ये सरकेलेली आहे किंवा असे आणि तोंडातून, नाकातून पातळ पदार्थ बाहेर पडला आहे का आणि तो कोणत्या बाजून वाहिला आहे ते पाहावे.

प्राण निघून गेलेलाच आहे असे अगोदरच आढळल्यास त्यावेळी दोऱ्या वगैरे असतील त्या जशाच्या तशा (न कापता) प्रेताबरोबर पाठवाव्यात, प्रेतावर काही जखमा किंवा माराच्या खुणा असल्या किंवा अन्य कशाने जखम इजा केल्याच्या खुणा असल्यास त्यांचा बारकाईने तपास करावा.

फासावर टांगून घेतलेले प्रेत दोऱ्या कापून खाली उतरविल्यावर दम

कोंडण्याकरिता योजिलेली साधने काढून टाकल्यावर मुख्यत्त्वे करून मानेची स्थिती कशी आहे ते पाहावे. खुणा वर्तुळाकार होत्या की वाकड्या होत्या ते लिहावे. टांगलेल्या स्थितीत जमिनीपासून उंची किती होती, उभे राहण्यास पुरेशी जागा नसेल तर प्रेत कोणत्या स्थितीत होते ते लिहावे.

**प्रेत उघड्या जागेवर सापडल्यास :-** एखाद्या वेळी प्रेत उघडे शेतात टाकलेले किंवा मैदानात अथवा माळरानावर सापडले असेल तर प्रेताच्या शरीरावर जखमा होत्या का त्यांची संख्या प्रकार आणि एकंदर दृश्य कसे होते ते लिहावे. जर एखादे हत्यार सापडले तर ते कागदाने गुंडाळून घ्यावे. रक्ताच्या खुणा असल्यास ते सीलबंद करून ठेवावे. प्रेतानजीक रक्ताचे डाग, डागाळलेले दगड किंवा माती आढळल्यास सीलबंद करून अधिकाऱ्याच्या स्वाधीन करावे.

■■■

**मंदिरे, मशिदी इत्यादी**
**अलग असतात, परंतु**
**भारतरुपी जे मोठे मंदिर आहे**
**ते सर्वांचेच आहे.**



**पोलिसांच्या कामकाजाचे यश**
**हे जनतेच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने**
**एककात मोजले पाहिजे**

# आपले शेजारी खरे पहारेकरी

**घराची मौल्यवान वस्तूंची काळजी:–** आपल्याकडे मौल्यवान वस्तू नाहीतच मग आपल्या घरी चोरी घरफोडी होणारच नाही. चोरांना आपल्या घरात काहीच मिळणार नाही म्हणून चोर येणारच नाहीत असे गृहीत धरणे चुकीचे आहे. आपल्या घरात काही आहे किंवा नाही हे चोरांना ठाऊक नसते. त्यामुळे यदाकदाचित चोर आलेच तर काहीच न सापडल्याने चिडून आपल्याला ते मारहाण करू शकतील किंवा आपल्या जिवालाही धोका निर्माण होऊ शकतो. हे लक्षात घेऊन आपणच आपली काळजी घेतली पाहिजे. आपल्याकडे जे काही असते ते मौल्यवानच समजले पाहिजे.

आपण आपली काळजी घ्यायची म्हणजे नेमके काय करायचे या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सर्वात अगोदर घराच्या रचनेचा, बांधकामाच्या वेळी केलेल्या सोयींचा मुद्दा विचारात घेतला पाहिजे. घर बांधते वेळी दरवाजांना आणि खिडक्यांना ग्रील अवश्य लावावे. पण त्या ग्रीलचे फिटिंग आतील बाजूने करावी. घराचे कडी कोयंडे फक्त स्क्रुने लावलेले असू नयेत तर ते मजबूत भक्कम नट–बोल्टांनी पक्के केलेले असावेत. दारांच्या आतून लोखंडी अडसर अवश्य बसवावा. आपण अनेकदा बाहेरून येतो. आपल्या माघारी चुकून काहीही राहू शकते. एखादा इसम आपल्या घरात घुसलेला असू शकतो. आपण रात्रीबेरात्री प्रवास करून आलेलो असतो. अशा वेळी एकदम दरवाजा उघडू नये थोडी चाहूल घ्यावी, कानोसा घ्यावा. पिनहोलमधून पाहावे, खिडकीतून पाहावे. कोणी आत दिसल्यास त्याची चेहरेपट्टी लक्षात ठेवावी. आपण आल्याची चाहूल लागताच तो इसम आलेल्या मार्गाने पळून जाऊ शकतो. तेव्हा त्याची पाहिलेली चेहरेपट्टी, त्याला पकडण्यासाठी वर्णन करता आली पाहिजे. खरे म्हणजे आपण घरी असतांनासुद्धा काळजी घेतली पाहिजे, दरवाजाला आतून लिव्हर लॉक लावावे. घरातून बाहेर जाते वेळी घर पूर्ण बंद करून कुलुपावर पडदा

टाकावा. रात्रीच्या वेळी घराच्या चारही बाजूंनी प्रकाशाची व्यवस्था करावी. प्रखर उजेडाचे बल्ब लावावेत.

**रिमोट बेल :-** आपल्या सुरक्षिततेसाठी आपली काळजी आपणच घ्यावी तशी शेजाऱ्यांचीही घ्यावी. परस्परांत सहकार्य असल्यास एकावरचे संकट आले तर दुसऱ्याला त्याची लगेच कल्पना येऊ शकेल अशी सोय केली पाहिजे. आपण आपल्या घरातून रिमोट कंट्रोलवर बटन दाबताच शेजाऱ्याकडे धोक्याची बेल त्यांच्यासाठी ठेवावी. ही एक चांगली कल्पना आहे. घराच्या सुरक्षिततेसाठी जातिवंत कुत्रा पाळावा. आवश्यक वाटत असल्यास परवाना घेऊन हत्यार घरी ठेवावे.

**अनोळखी व्यक्तीपासून सावधान :-** अनेकदा घरच्या कर्त्या व्यक्ती नसताना कोणीही अनोळखी इसम आल्यास नीट चौकशी केल्याशिवाय आणि खात्री पटल्याशिवाय त्याला घरात घेऊ नये. विशेषतः घरातल्या महिलांनी तर अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. अनोळखी व्यक्ती कशासाठी आली, काय काम आहे विचारावे, संशय आल्यास काही जास्तीचे बोलू नये. शिवाय त्या व्यक्तीचा चेहरा नीट ध्यानात ठेवावा. विचारपूस करून नाव, गाव, पत्ता विचारून नंतर लिहून ठेवावा. घरात कोणी पुरूष नाही असे एकदम सांगू नये. लवकर घरी येणार आहे की नाही हे कळू देऊ नये. मात्र अनोळखी व्यक्तीला घरात प्रवेश देऊ नये. मुंबई पुण्यातील लोक अशीच काळजी घेतात.

**इतर बाबतीमधील दक्षता :-** आपल्या घरी आपण कामाला जे नोकर ठेवतो, त्यांच्या पूर्वचारित्र्याची नीट माहिती घेऊनच कामाला ठेवावे. घरातल्या मौल्यवान दागिन्यांचे फोटो काढून ठेवावेत. शक्यतो दागिने, मौल्यवान वस्तू वगैरे बँक लॉकरमध्ये ठेवावेत. घरात नेहमी टॉर्च, शिट्टी, काठी हाती लागेल अशा ठिकाणी ठेवावी.

**सतर्कता :–** आपल्या घरी काही असे विपरीत घडलेच तर शेजाऱ्यांना जागृत करावे. मित्रांना नातेवाईकांनाही कळवावे. विशेष म्हणजे सर्वात अगोदर पोलिसांना कळवायला पाहिजे. आपण बाहेरगावी जात असल्याचे विश्वासातल्या व्यक्ती शिवाय कोणाला सांगू नये. घरालगतच्या झाडावरून गच्चीच्या, गॅलरीच्या मार्गाने कोणी येऊ नये यासाठी आवश्यक तेवढी काळजीपूर्वक व्यवस्था करावी, आणखी एक सर्तकता अवश्य बाळगली पाहिजे. आपल्या घरात परप्रांतीय लोकांना भाड्याने राहण्यासाठी जागा देताना ते कुटुंबवत्सल आहेत की नाही, त्यांचे राहणीमान, व्यवसाय किंवा नोकरी याची खात्री करून घ्यावी. संशयास्पद लोक वाटल्यास कितीही जास्तीचे भाडे मिळाले तरी जागा देऊ नये.

**संशयास्पद व्यक्ती :–** आपल्याशी काहीही संबंध नसलेली एखादी व्यक्ती आपण नेहमी पाहतो. काहीही काम धंदा, नोकरी व्यवसाय न करणारी व्यक्ती भरमसाट खर्च करीत असेल किंवा ज्या व्यक्तीचे उत्पन्न फार तुटपुंजे आहे आणि उत्पन्नाच्या मानाने त्या व्यक्तीचा खर्च, राहणीमान, शौक फार वाटत असेल तर अशा व्यक्तीचे अन्य उत्पन्न संशयास्पद मार्गांनी मिळालेले असू शकते. ते अनुमान सहसा चुकत नाही. असे कोणी दिसल्यास पोलिसांकडे पत्राद्वारे कळवावे. किंवा तक्रारपेटीत लेखी माहिती टाकावी. नियंत्रण कक्षालाही कळवावे. आपली माहिती, नाव, गाव कळवावे. गुप्तता पोलीस ठेवतात आणि आपण चांगलेच करीत असल्यावर भीती बाळगण्याचे कारण नसते.

**पोलीसांची मदत करावी :–** एखाद्या चोरीच्या घटनेनंतर, आपल्या पाहण्यातला कोणी इसम तेव्हापासून गैरहजर असल्यास, शंकेची बाब वाटत असल्यास पोलिसांना कळवावे. आपण किरकोळ कामासाठी बाहेर जातो, तेव्हा शेजाऱ्यांना सांगून जावे. बाहेरगावी जास असल्यास पोलीस स्टेशनला माहिती द्यावी. म्हणजे पोलीसही रात्रीच्या गस्तीच्या वेळी विशेष करून ध्यान ठेवतील.

**छोट्या पण महत्त्वाच्या गोष्टी :-** अनोळखी व्यक्तीने दिलेला प्रसाद, मिठाई खाऊ नये. घरातल्या कपाटाच्या, तिजोरीच्या किल्ल्या सहज उपलब्ध होतील अशा ठिकाणी ठेवू नयेत. घरफोडी करणाऱ्यांनाच नव्हे तर सहजच घरात वावरणाऱ्या एखाद्या व्यक्तीला त्यामुळे चटकन कपाट उघडता येईल. म्हणून किल्ल्या ठेवण्याच्या दोन तीन जागा असाव्यात. ज्यांना माहिती असाव्यात त्यांनाच सांगावे इतरांना कळू देऊ नये. बाहेर जाते वेळी घरातला एखादा बल्ब चालू ठेवावा. घराच्या दारासोबत लोखंडी जाळीचाही दरवाजा बसवून घ्यावा. एकट्या स्त्रीने अधिक सावध राहावे. आणखी एक म्हणजे गोदरेजचे लॅच असले म्हणजे सगळे सुरक्षित नसते. स्क्रू ड्रायव्हरच्या मदतीने लॅच उघडले जाऊ शकते. त्या सोबतच दुसरे भक्कम कुलूप लावून बाहेर जावे.

**ओळखीची खात्री करून घ्या :-** टेलीफोन दुरूस्तीला आलो, लाईनमन आहे, विजेचे मीटर बघायचे आहे, प्लंबर आहे, गॅस एजन्सीकडून आलो असे सांगणाऱ्या व्यक्तीबद्दल खात्री करून घ्या. नेहमीचा गॅस वाला, लाइनमन आपल्या थोड्या परिचयाचा असू शकतो. एकदम नवखा असेल तर ओळख पटल्याशिवाय त्याला घरात येऊ देऊ नका. विशेषत: एकट्या महिलेने खबरदारी घ्यावी. घरात इतर कोणी असतील तरीदेखील नवख्या व्यक्तीबाबत सतर्कता बाळगावी. स्वयंपाकघरात, बाथरूममध्ये एखादे बटन असे बसवावे की प्रसंगी ते दाबताच अपार्टमेंटच्या किंवा सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळ अलार्म बेल वाजेल. कधी कधी चोर घरातल्या महिलांना धाक दाखवून बाथरूममध्ये किंवा स्वयंपाकघरात कोंडतात. तेंव्हा अशा अलार्मचा उपयोग होतो. अशा अनेक गोष्टी दिसायला छोट्या परंतु असायला मोठ्या महत्त्वाच्या असतात हे लक्षात घेतले पाहिजे.

**नोकर, वॉचमन, फेरीवाले :-** अनेकदा गयावया करून नोकरी मागणारे येतात. त्यांना कामावर ठेवू नका. ओळखीच्या व्यक्तीकडून

शिफारस असेल तरच आणि तरीदेखील पूर्वेतिहास आणि चारित्र्याबद्दल खात्री झाल्याशिवाय नोकरीला ठेवू नका. मोठ्या शहरात सोसायट्यांसाठी, बंगल्यासाठी, कॉलनीसाठी वॉचमन ठेवणे आवश्यक असते. परंतु त्या बाबतही काळजी घ्यावी शक्यतो नामांकित सिक्युरिटी सर्व्हिसकडूनच वॉचमन, गार्ड घ्यावेत वॉचमनदेखील सुदृढ असावा. व्यसनी नसावा. आपण झोपल्यानंतर झोप काढणारा नसावा. अधून मधून वॉचमनवरच आपला वॉच पाहिजे.

दुपारच्या वेळी सहसा घरातील कर्तेधर्ते पुरूष बाहेर कार्यालयात, व्यवसायाच्या ठिकाणी किंवा कंपनीत गेलेले असतात. त्यावेळी अमुक घ्या तमुक घ्या म्हणणारे सेल्समन बेल वाजवितात. त्यांना अजिबात थारा देऊ नका. तुम्हाला हवी असलेली वस्तू स्वस्त किंमतीत देण्याबद्दल ते बोलतात. तुम्ही स्वत: मार्केटमध्ये जाऊन हवी तशी खरेदी करू शकतात. शंभरात एखादा सेल्समन वाईट असू शकतो. परंतु त्यामुळे प्रत्येकाशी वादही घालू नये आणि बोलूही नये. त्याच्यासाठी दार न उघडताच जाण्यास सांगितले तर काही होत नाही.

कसलीही घटना घडताच पोलीस स्टेशनला कळवावी. फोन घेताना खात्री पटल्याशिवाय घरातली माहिती सांगू नये. आपला प्रवास, सहली याबद्दल उगीच सगळ्यांना तपशील सांगू नये. जाऊन आल्यानंतर सगळे वर्णन जरूर सांगावे. ब्लॅक कॉल येत असतील तर एक्सचेंजला कळवावे. पोलिसांना कळवावे. शक्य झाल्यास कॉलर आयडेंटीचे उपकरण बसवून घ्यावे.

**वाहनाबद्दल थोडसे महत्त्वाचे :-** रात्रीच्या वेळी एखाद्या वाहनाबद्दल शंका आल्यास वाहनाचा मेक, रंग आणि क्रमांक नोट करून ठेवावा. प्रसंग पडल्यास पोलीसांना त्याचा उपयोग होईल. आपली कार पार्क करण्यापूर्वी आजबाजूची तपासणी करून ठेवावी. प्रवासाला निघताना गाडीची तपासणी करून मगच निघावे. प्रवासात आपल्या मागून येणाऱ्या वाहनाची हालचाल संशयास्पद वाटल्यास रस्त्याच्या कडेला असलेल्या

ठिकाणी गर्दी पाहून थांबावे. पाठलाग तर होत नाही ना याची खात्री करून घ्यावी. आपल्या वाहनाच्या चेसीचा नंबर, इंजिनचा नंबर वेगळ्या ठिकाणी नोंद करून ठेवावा.

**दुकानाबद्दल – कारखान्यांबद्दल :-** दुकान बंद करताना आतील बाजूच्या खोलीचे किंवा टॉयलेटचे दार बंद करून ठेवावे. पायरीच्या टोकावर शटर बसवू नये. शक्यतो सेंट्रल लॉक बसवावे. दुकानात अलार्म बसवावा. तसेच आजू बाजूच्या दुकानांपैकी एक दोन ठिकाणी देखील सूचना देण्यासाठी व्यवस्था करून ठेवावी. दुकानातून कॅश-मोठी रक्कम-बँकेत किंवा घरी नेण्याच्या वेळा अधून मधून बदलाव्यात, मार्गही बदलावा.

विविध प्रकारे आपणच काळजीपूर्वक वागलो तर पोलिसांचे काम सोपे होईल. किरकोळ चुकीमुळे भयंकर प्रसंग ओढवणार नाहीत. आपण शेजाऱ्यांना सहकार्य द्यावे. सहकार्य त्यांच्याकडून मिळेलच, एकमेका साह्य करू... ही म्हण या ठिकाणी उपयोगी वाटते.

■■■

**सर्व काही गेल्यावर**
**आपल्याजवळ जे काही उरते**
**त्याला अनुभव म्हणतात.**



**सेवा जवळून, आदर दुरुन**
**आणि ज्ञान आतून असावे.**

# यशस्वी होण्याची गुरुकिल्ली

**सूत्र १:-** पोलीस प्रशासन लोकाभिमुख असावे आणि सर्वसामान्य नागरिक हा पोलिसांच्या कार्यप्रणालीचा केंद्रबिंदू मानला जावा. तळागाळातल्या लोकांना, दुर्बल घटकांना, महिलांना प्राधान्य किंबहुना त्यांना झुकते माप दिले जावे. सन्माननीय नागरिकांना सौहार्दाची वागणूक आणि तत्परतेची सेवा मिळावी असा दृष्टिकोन ठेवणे हे नऊ सूत्रीमधील पहिले सूत्र होय.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी :-** आपल्या कार्यक्षेत्रातील एकटे राहणाऱ्या ६५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांची नावे, पत्ते, फोन क्रमांक मिळवून त्यांची यादी करून ठेवावी. आठवड्यातून किमान एक वेळा त्यांना भेटून क्षेमकुशल विचारणे.

**गृहनिर्माण संस्था व कॉलनी :-** आपल्या हद्दीतील गृहनिर्माण संस्थांची, कॉलन्यांची आणि वस्त्यांची यादी करावी, त्या संस्थांचे पदाधिकारी, वस्त्यांमधील प्रमुख नागरिक, त्यांचे फोन क्रमांक घेऊन प्रत्येक ठिकाणच्या चौकीदाराचीही माहिती घ्यावी. अशा प्रत्येक ठिकाणी एक व्हिजिट बुक ठेवणे.

**शाळा-महाविद्यालये :-** आपल्या हद्दीतील शाळा आणि महाविद्यालयांची यादी बनविणे, त्यांच्या मुख्याध्यापकांची/प्राचार्यांची किमान एकदा तरी आठवड्यातून भेट घेऊन विचारपूस करणे.

**छेडछाडीस प्रतिबंध :-** शाळा, महाविद्यालयांचा परिसर, एसटी स्टँड, शहर बस स्टॉप, रेल्वे स्टेशन या ठिकाणी गर्दीच्या वेळी पोलीस ठेवून तेथे महिलांच्या छेडछाडीस प्रतिबंध करणे.

**महिलांसाठी प्रबोधन :-** महिला दक्षता समित्यांच्या बैठका घेणे, त्यांच्या प्रबोधनासाठी महिला अतिथी व्याख्यात्या बोलावून त्यांची व्याख्याने आयोजित करणे.

**पोलिसांची तत्परता :-** कोठेही गुन्हा घडल्याचे कळताच पोलिसांची घटनास्थळी त्वरित धाव घेऊन गुन्ह्याचा तत्परतेने तपास करून उघडकीस आणणे.

एवढे मुद्दे पहिल्या सूत्रात समाविष्ट केलेले असल्यास पोलिसांचे प्रशासन खऱ्या अर्थाने लोकाभिमुख होण्यास मदत होईल.

**सूत्र २- तक्रारींची नोंद घेण्यात कुचराई होणार नाही याची दक्षता घेणे, आणि तक्रारींचे स्वरूप कमी होणार नाही याची खबरदारी घेणे हे दुसरे सूत्र धरावे :-** त्यासाठी पोलीस ठाण्यास अचानक भेट देऊन तेथे हजर असलेल्या लोकांकडे विचारपूस करणे, त्यांच्या तक्रारींकडे योग्य प्रकारे लक्ष दिले जाते किंवा नाही यांची चौकशी करायला पाहिजे.

अदखलपात्र गुन्ह्यांचे रजिस्टर तपासायला हवे. गुन्ह्यांचे स्वरूप तर कमी केले नाही ना? याची खात्री करून घेतली पाहिजे.

पोलीस ठाण्यात तक्रार पेटी ठेवायला पाहिजे. तशी पेटी ठेवलेली असल्यास त्यात लोकांनी काही तक्रारी टाकल्या आहेत की नाही याची चौकशी करणे आणि त्यापैकी किती तक्रारींची दखल घेतली याबद्दल विचारपूस करणे.

**सूत्र ३ - गणवेशातील पोलिसांचा वापर वाढवून दिवसा आणि रात्रीच्या गस्तीमध्ये सुधारणा घडवून आणणे हे तिसरे सूत्र समजावे :-** विशेष शाखांमधील पोलीस अधिकारी/ पोलीस कर्मचाऱ्यांशिवाय इतर सर्व जण आपल्या गणवेशातच आपले कर्तव्य पार पाडतील याची दक्षता घेणे.

सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी सर्व बैठका अथवा समारंभास गणवेशातच

उपस्थित राहणे. पोलीस वाहनांच्या चालकांनी गणवेशातच आपले कर्तव्य बजावणे. प्रत्येक महिन्यात किमान एकदा दिवसा आणि एकदा रात्रीची नाकाबंदी लावावी आणि सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी नाकाबंदी कर्तव्य पार पाडणे. तसेच नाकाबंदी दरम्यान जिल्ह्यातून इतर जिल्ह्यांत जाणाऱ्या सर्व रस्त्यांची, वाटांची नाकाबंदी करणे. सर्व संशयित वाहने तपासणे, संशयित व्यक्तींची तपासणी, प्रसंगी झडतीही घेणे. अभिलेखावरील सर्व गुन्हेगार तपासणे, त्यांच्या घरांच्या झडत्या घेणे. हत्यारे किंवा स्फोटकांच्या साठ्यांची सर्व संशयित ठिकाणी तपासणे. सर्व सिनेमागृहे, रेल्वे स्थानके, बस स्थानके, गॅरेजेस तपासणे. ही नाकाबंदी वेगवेगळ्या दिवशी वेळा बदलून आणि अचानकपणाचे तत्त्व लक्षात घेऊन लावणे.

**सूत्र ४ – अवैध धंद्यांना परिणामकारक रीतीने आवर घालून गुन्हेगार आणि गुंड प्रवृत्तीच्या इसमांविरूद्ध कठोर कायदेशीर कारवाई करणे :-** आपल्या हद्दीत कोठेही मटका नावाचा जुगार चालू न देणे, तसेच महिन्यातून किमान एक वेळा तरी आठवडी मोहीम उघडून गावठी दारू, अवैध वाहतूक, जुगार, वेश्या व्यवसाय इत्यादी अवैद्य धंद्यावर धाडी घालणे आणि त्या प्रकारांना पायबंद घालणे. हद्दीतील गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा पूर्वेतिहास काढून त्यांच्या याद्या तयार करणे. त्याच्याविरूद्ध एमपीडीए हद्दपारी कलम १० सीआरपीसीखाली कठोर कारवाई करणे. एवढी कामगिरी नियमित आणि सुव्यसस्थित केली पाहिजे. हे चौथ्या सूत्रात नमूद केले आहे.

**सूत्र ५ :-** गुन्ह्यांचा तपास त्वरेने करून प्रकरणे मुदतीतच कोर्टात दाखल करणे, तसेच गुन्हे उघडकीस आणण्याचे गुन्हे सिद्ध करण्याचे आणि चोरीला गेलेली मालमत्ता परत मिळविण्याच्या प्रमाणात वाढ करणे.

**सूत्र ६– प्रतिबंध कारवाईत वाढ करून गुन्ह्यांना आळा घालणे मात्र ही कारवाई निष्पाप लोकांच्या विरूद्ध होणार नाही याची दक्षता घेणे :-**

गेल्या पाच वर्षातील भाग १ ते ५ खालच्या अभिलेखांवर गुन्हेगारांच्या नावांची आणि पत्र्यांची वर्षनिहाय, शिर्षकवार वादी करून त्यांच्या हालचाली तपासणे. त्यांच्या व्यक्तिगत झडत्या घेणे. घरांच्याही झडत्या घेणे.

**सूत्र ७– पोलिसांच्या वर्तनात आणि कार्यक्षेत्रात वाढ करण्यासाठी चुकार आणि निष्काळजींना शासन करणे, परंतु शिस्तप्रिय, होतकरू आणि उत्तम कामगिरी बजावणाऱ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणे. पोलीस आणि त्यांच्या कुटुंबीयांचे आरोग्य आणि कल्याणाकडे विशेष लक्ष देणे** :– सर्व स्तरांवरील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या हाताखालील लोकांच्या पोशाखातील, बोलण्या–चालण्यातील आणि वर्तनातील चुका तात्काळ निदर्शनास आणून घ्याव्यात आणि त्यांना त्या सुधारण्याच्या सूचना द्याव्यात. असे केल्यानेही सुधारणा झाली नसेल तर त्याच्याविरूद्ध कसुरी अहवाल विनाविलंब पाठवून त्यांना शिक्षा देण्यात मुळीच हयगय होणार नाही याची काळजी घ्यावी. परंतु ज्या पोलीस अधिकाऱ्याने अथवा पोलीस कर्मचाऱ्याना चांगली कामगिरी केली असेल, त्यांना तात्काळ शाबासकी देऊन उचित गौरव करावा. कोणत्याही परिस्थितीत गौरव करण्यात विलंब होता कामा नये.

दर मंगळवारी आणि शुक्रवारी ठरलेल्या ठिकाणी सोयीनुसार परेड घेण्यात यावी. त्यासाठी जास्तीत जास्त पोलीस अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध करावेत. त्यावेळी चांगल्या गणवेशांसाठी उचित बक्षिसे जाहीर करावीत.

राष्ट्रीय सण अथवा इतर निमित्त साधून पोलीस अधिकारी/ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी खेळांचे, स्पर्धांचे आयोजन करावे.

पोलिसांच्या कुटुंबासाठी पोलीस वसाहतीमध्ये स्थानिक/खासगी वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मदतीने आरोग्य शिबिरं आयोजित करावे.

पोलिसांच्या सर्व मुलींना, मुलांना पोलीस शिपाई म्हणून भरती होणे शक्य नसते. त्यामुळे सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील उद्योगधंद्यातून अथवा व्यापार उद्योगातून पोलीसांच्या मुलामुलींना नोकरीची संधी प्राप्त करून देण्यासाठी खास प्रयत्न करावेत.

**सूत्र ८- कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी समाजातील विविध जाती धर्माच्या लोकांत सामंजस्य आणि एकोपा वाढीस लावण्यासाठी सतत उपक्रम घेत राहणे :-** केवळ गणेशोत्सव, नवरात्र, रमझान ईद, बकरी ईद एवढे सण साजरे करण्याच्या वेळीच शांतता समितीच्या बैठका घेण्यात येतात. सर्व समाजाला शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवाहन केले जाते. अशा प्रसंगानुरूप बैठका न घेता जर सर्व समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना कोणत्या ना कोणत्या निमित्ताने वेळोवेळी एकत्र आणले तर त्यातून विविध जातीधर्मांतील तेढ संपून त्यांच्यात सामंजस्य निर्माण होऊन एकोपा वाढीस लागेल. अशा दृष्टी कोनातून खालील प्रमाणे कार्यक्रम घ्यावेत.

अ) महानगर पालिका आणि नगरपालिका असलेल्या शहरांमध्ये वॉर्ड एकता समित्या स्थापन कराव्यात. प्रत्येक वॉर्डासाठी वेगळी एकता समिती असेल. त्या समितीच्या बैठका व्हाव्यात. महानगरपालिका अथवा नगरपालिका नसलेल्या छोट्या शहरांत/गावात शहर एकता समिती आणि ग्राम एकता समिती स्थापन करावी.

ब) त्या वॉर्ड/शहर/ग्राम एकता समितीमध्ये खालीलप्रमाणे निमंत्रित राहतील.

१) त्या वॉर्डात वास्तव्य करत असलेल्यांमध्ये खासदार असतील किंवा आमदार असतील अथवा जिल्हा परिषदेचे पंचायत समितीचे सदस्य असतील तर त्यांना अवश्य बोलवावे.

२) त्या वॉर्डाचे नगरसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे अध्यक्ष, सदस्य, पोलीस पाटील, तलाठी आणि ग्रामसेवक.

३) त्या वॉर्डात वास्तव्य करणाऱ्या सर्व समाजांचे प्रत्येकी तीन प्रतिष्ठित नागरिक.

४) त्या वॉर्डात वास्तव्य करणाऱ्या तीन प्रतिष्ठित महिला कार्यकर्त्या.

५) त्या वॉर्डात वास्तव्य करणारे गणपती मंडाळांचे, मित्रमंडळांचे तालीम मंडळाचे अध्यक्ष आणि सचिव.

६) त्या वॉर्डात वास्तव्य करणारे सर्व राजकीय पक्षांचे तीन प्रमुख कार्यकर्ते.

७) त्या वॉर्डात वास्तव्य करणारे सर्व पत्रकार.

८) त्या वॉर्डातील व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी.

९) त्या वॉर्डाशी संबधित असलेले वीज मंडळाचे, रेशनिंग खात्याचे, टेलीफोन खात्याचे, पाणीपुरवठा खात्याचे, बांधकाम खात्याचे अधिकारी.

१०) त्या वॉर्डातील शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक आणि प्राचार्य.

११) त्या वॉर्डातील क्रियाशील युवा कार्यकर्ते आणि जिल्हा स्तरावरील, राज्य पातळीवरील खेळाडू मुले-मुली.

१२) त्या वॉर्डात वास्तव्य करणारे शांतता समितीचे सदस्य, महिला दक्षता समितीच्या सदस्या, ठाणे प्रमुख्याने ज्यांना वॉर्ड एकता समितीच्या बैठकीत निमंत्रीत करायचे आहे. त्यांच्या नावाच्या पत्त्यांसह याद्या कराव्यात. त्या सर्वांना निमंत्रित करावे. मात्र गुन्हेगार आणि बेकायदेशीर कृत्ये करणाऱ्या कोणालाही या बैठकीसाठी बोलावू नये.

शाळा-महाविद्यालयांमध्ये प्रायोजकांच्या मदतीने कार्यक्रम आयोजित करून प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना बक्षिसे प्रदान करणे. अशा कार्यक्रमांना त्यांचे पालक तसेच गावातील आणि आजूबाजूच्या गावांतील सर्व जाती-धर्मांच्या प्रतिष्ठित स्त्री-पुरुषांना निमंत्रित करून तेथे उपस्थित असलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने त्यांना संबोधित करावे.

गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सवाच्या दरम्यान एनसीसी आणि आरएसपीच्या विद्यार्थ्यांचा वाहतूक नियमन आणि गर्दी काबूत ठेवण्यासाठी उपयोग करून घ्यावा.

■ ■ ■

# पोलीस पाटील गावचा फौजदार

पोलीस पाटील म्हणजे गाव प्रमुख म्हणून ओळखला जातो. कारण पोलीस पाटील हे एक जबाबदार व्यक्तिमत्त्व आहे आणि हा पोलीस यंत्रणेचा गाव पातळीवरील महत्त्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. पोलीस पाटलास गावात प्रमुख म्हणून वावरत असतांना आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहे याची पुरेपूर जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे.

ही जाणीव असेल तरच तो आपले गाव पातळीवरील फौजदारी कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडू शकेल. मी पोलीस पाटलांसाठी गावाचा फौजदार हा शब्द प्रयोग वापरला हे वावगे ठरू नये. कारण गावात एखादा गुन्हा घडल्यानंतर सर्वात प्रथम घटनास्थळी पोलीस प्रशासनाचा घटक म्हणजे पोलीस पाटील होय.

त्यानंतर बीट अंमलदार, किंवा संबंधित पोलीस अधिकारी, घटनास्थळी हजर होतात. परंतु हे येण्यापूर्वी त्या गुन्ह्याचा किंवा घटनेचा प्रथमावस्थेतील तपास करणे घटनास्थळावरील परिस्थिती आहे त्या स्थितीचे संरक्षण/जखमींना प्रथमोपचार, आरोपीस ताब्यात घेणे इ. गोष्टी तो करू शकतो, किंवा एखादी छोटी मोठी घटना असेल तर गाव पातळीवर चौकशी करून निःपक्षपातीपणाने न्यायदान करून गावात आपला दबदबा कायम राखू शकतो आणि त्यास कायद्याने प्रदान केलेले अधिकार योग्य प्रकारे वापरले तर गुन्हेगारीवर चांगले नियंत्रण ठेवू शकतो. तसेच कायदा व सुव्यवस्था राखून गावातील शांतता टिकविता येऊ शकेल. तेव्हा या पदावरील व्यक्तीने नि:पक्षपातीपणाने न्यायदान करून गावात आपला दबदबा कायम राखू शकतो आणि त्यास कायद्याने प्रदान केलेले अधिकार योग्य प्रकारे वापरले तर गुन्हेगारीवर चांगले नियंत्रण ठेवू शकतो. तसेच त्यास कायदा व सुव्यवस्था राखून गावातील शांतता टिकविता येऊ शकेल. तेव्हा या पदावरील व्यक्तीने नि:पक्षपातीपणाने आपले कर्तव्य बजावले तर त्याचा

फार मोठा फायदा पोलीस प्रशासनास होईल आणि पर्यायाने पोलीस पाटलाबद्दल गावात आदर निर्माण होईल म्हणून त्यास गावचा फौजदार म्हणून दिलेली उपमा ही सार्थ ठरेल.

सध्याच्या बदलत्या परिस्थितीत कायद्यामध्ये बदल होत आहे तसे प्रशासनात व काम करण्याच्या पद्धतीतदेखील आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. आणि या बदलत्या परिस्थितीचा अभ्यास, नवीन कायद्यांची कल्पना पोलीस पाटलांना असणे अत्यंत आवश्यक आहे आणि हे माहिती देण्याचे काम संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यामार्फत होणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे असे पाहिले जाते की बऱ्याच पोलीस पाटलांना त्यांच्याकडे आवश्यक असणारे रेकॉर्ड काय आहे? त्या रेकॉर्डस्चा केव्हा व कसा करायचा? याचे देखील ज्ञान नाही. तेव्हा या बाबतीत सर्व पोलीस पाटलांना मराठीतून प्रशिक्षण देण्याची गरज आहे. व या प्रशिक्षणानंतर त्यांची परीक्षा घेण्यात यावी. म्हणजे पोलीस पाटलातील योग्यता सिद्ध करता येईल.

पूर्वी ब्रिटिशांच्या काळात किंवा राजेशाहीमध्ये पोलीस पाटलांची नेमणूक करतांना त्यांच्या घराची आर्थिक परिस्थिती, त्यांची जातकुळ वगैरे पाहिजे जात असे, परंतु आता पोलीस पाटलांसाठी देखील शैक्षणिक पात्रता व वयोमर्यादा असून त्याचेदेखील योग्य अधिकाऱ्यामार्फत निवड केली जाऊन प्रशिक्षकांची नेमणूक केली जावी. म्हणजे या पदाचा दर्जा वाढेल असे आम्हास वाटते.

पोलीस पाटलांना गाव पातळीवर काम करताना गावातील लहान-मोठ्या घटनांचा तपशील हस्तगत करून संबंधित पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांना गाव भेटीच्या वेळी किंवा आवश्यकता असल्यास तात्काळ प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती देणे आवश्यक आहे. या संदर्भात प्रतिबंधक स्वरूपाच्या उपाययोजन करणे आवश्यक असल्यास तसे कळवावे लागते.

गावातील गावगुंडांची माहिती, गुन्हेगार, फिरत्या टोळ्यावर देखरेख,

समाज कंटकांच्या हालचाली, विशेषत: जातीयवादी घटनांमध्ये गोवलेल्या इसमांची माहिती देणे, धार्मिक स्थळाचे/पुतळ्यांचे संरक्षण, रात्रीची गस्त, गस्तीवरील कर्मचाऱ्यांना साह्य करणे तसेच पहिल्या माहितीच्या अहवाल पाठविणे. आरोपींना पार पाडाव्या लागतात आणि हे पोलीस पाटलास तेव्हाच साध्य होईल जेव्हा तो आपले संबंध पोलीस स्टेशन अधिकारी/तहसीलदार आदी संबंधित वरिष्ठ अधिकार वर्गाशी सतत संपर्क ठेवून माहिती देत राहील.

यातून पर्यायाने पोलीस पाटलाचे गावपातळीवरील महत्त्व/प्रभाव वाढण्यास मदत होते आणि सध्या अभाव दिसून येत असल्याने गावातील पोलीस पाटलांचे महत्त्व कमी होत चालले आहे.

पोलीस पाटील हे नि:पक्षपणे काम करीत नसून बरेच पोलीस पाटील हे गावातील राजकारणात/गटबाजीत प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सामील झालेले दिसून येतात. यामुळे पोलीस पाटील नावाच्या व्यक्तीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला आहे.

आणि हा दृष्टिकोन बदलावयाचा असेल तर पोलीस पाटलास गावात अत्यंत जागरूक व नि:पक्ष राहून सामाजिक/राजकीय परिस्थितीचे भान ठेवून कार्य करणे आवश्यक आहे आणि वरीलप्रमाणे पोलीस पाटलांनी, काम केल्यास त्यांची प्रतिमा उंचावल्याशिवाय राहणार नाही आणि ही प्रतिमा उंचावण्यासाठी सर्व पोलीस पाटलांनी आपआपली कर्तव्ये काटेकोरपणे पाळावीत हीच अपेक्षा आहे.

यासाठी त्याच्या अंगी काही महत्त्वाचे गुण असणे आवश्यक आहेत. म्हणजे तो धूर्त/संयमी/मेहनती/सर्वांशी गोड बोलणारा/निर्व्यसनी/विचारी सतत जागरूक असणारा असला पाहिजे म्हणजे पोलीस पाटील हे नाव उच्चारताच गावातील सामान्य नागरिकांसमोर एका चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा चारित्र्याचा, सर्वांवर दबदबा असणाऱ्या व्यक्तीचे चित्र उभे राहिले पाहिजे.

पूर्वीच्या आणि आजच्या पोलीस पाटीलमध्ये बरेच अंतर असले तरी

त्यास बऱ्याच गोष्टी कारणीभूत आहेत. परंतु आता भारत देश २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत आहे. आपल्या देशात पंचायत राज्य व्यवस्था उदयास आली आहे. तरी पण अशाही अवस्थेत पोलीस पाटलाचे महत्त्व कमी झालेले नाही. आणि हे कायम स्वरूपी आहे आणि पोलीस पाटीलांनी आपले कर्तव्ये व जबाबदारी कशी पार पाडावी, त्याचे अधिकार काय आहेत, त्यांची कर्तव्य काय आहेत यासाठी महाराष्ट्र शासनाने १९६७ मध्ये **महाराष्ट्र ग्रामपोलीस कायदा** पास केलेला असून त्यातील क्र. ६ ते १६ मध्ये त्याची कर्तव्ये नमूद केली आहेत. आणि या कायद्यानुसार प्राप्त झालेल्या अधिकारांन्वये काम करतांना आपल्या प्रत्येक अहवालाची प्रत संबंधित पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांना देणे आवश्यक आहे. यासाठी त्यांच्याकडे भटक्या टोळीचे रजिस्टर, आवक जावक रजिस्टर, व्हिजिट बुक, गुन्हेगारांची माहिती रजिस्टर, अकस्मात घटनांचे रजिस्टर, दैनंदिनी, टपाल वही, गाव माहिती रजिस्टर यादी रेकॉर्ड ठेवावे लागते.

■■■

**तुम्ही धर्म माना**
**किंवा मानू नका, परंतु**
**नीतीतत्त्वाचे पालन करणे**
**हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.**



**मनाला उचित विचारांची सवय**
**लागली की, उचित कृती**
**आपोआप घडते**

# महत्त्वाचे शासन निर्णय

**१. महाराष्ट्र शासन गृह विभाग, मुंबई क्र एल क्यू. १०४६/१३८८९ सहा दि. ३१ ऑगस्ट १९६७**

ज्या व्यक्तींची पोलीस पाटील म्हणून नेमणूक करावयाची असेल त्याची वर्तणूक व पूर्वेतिहासाची पोलीस खात्यामार्फत चौकशी केल्यानंतरच पोलीस पाटील म्हणून त्याची नेमणूक केली जाईल.

---

**२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र बी. व्ही.पी. १७७०/ २३५८३ दि. ७ मे १९६१**

पोलीस पाटील म्हणून काम करण्यास त्या गावात लायक व्यक्ती नियुक्तीसाठी मिळत नसेल अशा अपवादात्मक परिस्थितीत शेजारच्या गावातील म्हणजे परगावच्या व्यक्तीची नेमणूक विभागीय महसूल आयुक्ताच्या पूर्वपरवानगीने करता येते.

---

**३. महाराष्ट्र शासन गृह विभाग संदर्भ दि. १५ मार्च, १९७०**

पोलीस पाटील म्हणून काम करण्यास तयार असलेली एखादी महिला अर्जदार जर कायद्याच्या दृष्टीने आणि परिस्थितीने लायक असेल तर तिला पोलीस पाटील म्हणून नेमण्यास हरकत नाही.

---

**४. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. बी.व्ही.पी. १२६७/५३०३७/६ दि.२० ऑक्टोबर १९७०**

पोलीस पाटलाची नियुक्ती करताना मागासवर्गीय उमदवारांना विशेष प्राध्यन्य द्यावे.

**५. महाराष्ट्र शासन गृह विभाग**

पोलीस पाटलाच्या गैरहजेरीत, रजेच्या मुदतीत अथवा निलंबनाच्या काळात दोन महिन्यांसाठी पोलीस पाटलाची तात्पुरती नेमणूक तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी हे जाहीरनामा न काढता करू शकतात.

---

**६. महाराष्ट्र शासन गृह विभाग परिपत्रक दि. २६ मे १९७२**

निलंबन गैरहजेरी अथवा रजा इ.कारणांमुळे जर दोन महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी पोलीस पाटलाची नियुक्ती करावयाची असेल तर उपविभागीय अधिकारी यांना नियमाप्रमाणे जाहीरनामा काढून अर्ज मागवून त्याची छानबिन करून मगच नेमणूक करावी लागेल.

---

**७. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र बी.व्ही.पी/८१७५/४-८-पी.दि. ३० मार्च, १९७६**

नवीन निर्माण होणाऱ्या पोलीस पाटलांच्या पदांना भरती बंदीचा नियम लागू नाही.

---

**८. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. बी.व्ही.पी./८७८/१५८-पी. दि.२५ ऑगस्ट १९७८**

पाच(५) वर्षाची मुदत संपल्यावर प्रत्येक पोलीस पाटलांनी त्याची मुदत वाढवून मिळावी यासाठी अर्ज करणे आवश्यक नाही. असा अर्ज पोलीस पाटलांनी केला नाही म्हणून त्यांना कमी करणे हेही नियमाप्रमाणे धरून नाही.

---

**९. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र.बी.व्ही.पी./०१७६/पोल-८ दि.५ मार्च, १९७९**

अनुसूचित जाती जमाती तसेच भटक्या जातीजमाती यांच्यासाठी ठरवून दिलेल्या राखीव जागा तोपर्यंत पूर्णपणे भरल्या जात नाहीत तोपर्यंत अन्य नेमणुका करू नयेत.

**१०. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र.बी.व्ही.पी./२४७८/५-पोल-८ दि. १० मे १९८३**

महाराष्ट्र नागरी सेवा(बर्तणूक) नियम १९७९ च्या नियम ५ अ प्रमाणे राजकारणाची अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेशी संबंधित असलेल्या व्यक्तीस पोलीस पाटील म्हणून नियुक्त करता येणार नाही. मात्र पदांचा राजीनामा दिलेल्या व्यक्तीस अशी नियुक्ती मिळू शकेल. मात्र अशा नियुक्तीनंतर पोलीस पाटलास राजकारण अगर इतर संघटनेत भाग घेता येता येणार नाही. पोलीस पाटलास सहाकरी संस्थेचा सभासद होता येईल. सहकारी संस्थेची निवडणूक लढविता येईल. तसेच पोलीस पाटलाच्या कर्तव्यात बाधा येणार नाही. असा स्थानिक पातळीवरील व्यवसायही करता येईल.

---

**११. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. बी.व्ही.पी./०१८५/पोल/८ दि १३ मार्च १९८५**

पोलीस पाटलाच्या पदाचे आरक्षण करते वेळी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांची टक्केवारी सर्वसाधारणपणे उपविभागीय प्रत्येक तालुक्याला स्वतंत्रपणे राखण्यात यावी आणि प्रत्येक तालुक्यामध्ये भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या रिक्त पदांवर मागासवर्गीयांची नियुक्ती त्या तालुक्यातील त्यांची टक्केवारी पूर्णपणे भरून निघेपर्यंत करावी.

**१२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. बी.व्ही.पी./०१८५/पोल-८ दि. १ जानेवारी,१९८७**

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पेशल सिव्हिल ॲप्लिकेशन क्र. १३०४/७१ दि. १४ एप्रिल, १९७७ रोजी दिलेले आहेत की, उपविभागीय दंडाधिकारी, महाराष्ट्र ग्राम पोलीस ॲक्ट कलम-३ च्या अधीन राहून, कलम ५ अन्वये केलेल्या पोलीस पाठलाच्या नेमणुकीमध्ये

सदर नेमणूक उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना सारासार विचार न करता केली आहे. या सबबीवर विभागीय आयुक्त हस्तक्षेप करू शकत नाही.

---

**१३. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. बी.व्ही.पी. /१७६७/पी.३७३ पोल-८ दि. १२ जून, १९८७**

ज्या ठिकाणी पोलीस ठाणे, चौक्या, आऊट पोस्ट आहेत अशा ठिकाणी पोलीस पाटलाची नेमणूक करू नये.

---

**१४. महाराष्ट्रशासन, गृहविभागक्र. बी.व्ही.पी./१७७०/२६७६००/६ दि. ३ जानेवारी १९७२**

पोलीस पाटलांना दोन महिन्यांपर्यंत बिना मानधन रजा मंजूर करण्याचे अधिकार तहसीलदार यांना आहेत. दोन महिन्यांपेक्षा जास्त मुदतीची बिनामानधन रजा मंजूर करण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी यांना आहे. पोलीस पाटलांना सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ बिना मानधन रजेवर राहता येत नाही.

---

**१५. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र.बी.व्ही.पी/०६८१/२७४६१ (१११) पोल-८दि. २८ एप्रिल १९८३**

एका पोलीस पाटलाने स्वतःचा कार्यभार सांभाळून दुसऱ्या एखाद्या गावचा किंवा गावाचा पोलीस पाटीलपदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला तर त्यांना त्याबद्दल जास्त मोबदला अगर अतिरिक्त मानधन मिळणार नाही.

---

**१६. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. बी.व्ही.पी./०१८३/१४६६७/ पोल-८ दि. १४ मार्च १९८५**

पोलीस पाटलांना कार्यालयीन कामांसाठी आवश्यक असणाऱ्या लेखन सामुग्रीची व्यवस्था संबंधित पोलीस ठाण्यांनी त्यांना पुरविण्यात येणाऱ्या वार्षिक लेखन सामुग्रीमधून करावी.

**१७. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. बी.व्ही.पी. /१७६७/५५६३१/ सहा दि. २६ नोव्हेंबर, १९७२**

प्रत्येक पोलीस पाटलाने रोजनिशी लिहिली पाहिजे. मानधन घेण्यापूर्वी संबंधित पोलीस अधिकाऱ्यास ती दाखविली पाहिजे. म्हणजे गैरहजरीचे मानधन कमी करता येईल. त्याप्रमाणे प्रत्येक पोलीस पाटलाने भेट पुस्तक ठेवले पाहिजे. गावी येणाऱ्या महसूल किंवा पोलीस अधिकाऱ्यांचा त्यावर शेरा घेतला पाहिजे.

---

**१८. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. बी.व्ही.पी/१७७१/२-६ दि.२२ फेब्रुवारी, १९७१**

पोलीस पाटलाने आग (जळीत) अतिवृष्टी, पूर इतर नैसर्गिक आपत्ती व कायदा सुव्यवस्था बाबींचे अहवाल तहसीलदार व पोलीस उपनिरीक्षक यांच्याकडे न चुकता पाठवावयाचे असतात.

---

**१९. महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. बी.व्ही.पी./१५९१/५८ भाग/३-८ मुंबई दि. ४ ऑगस्ट, १९९७**

१) राज्यातील पोलीस पाटलांचे मानधन प्रतिमाह रू ५००/- करण्यात आले आहे.

२) नक्षलग्रस्त भागात नक्षलवादीविरोधी कारवायांत पोलीस पाटलाचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला रू १ लाख इतके सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

३) नक्षलवादी भागात नक्षलवादीविरोधी कारवाई करीत असताना मृत पावलेल्या पोलीस पाटील कुटुंबातील एका व्यक्तीस शक्यतो अनुकंपा तत्त्वाप्रमाणे पोलीस पाटील म्हणून नियुक्तीसाठी अग्रक्रम देण्यात यावा.

**२०. परिपत्रक क्र.बी.व्ही.पी./०२११/सीआर ३१/पोल-८- मंत्रालय, मुंबई दि. ७ नोव्हेंबर १९९१**

१) विशेष व उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या पोलीस पाटलांना राज्यपाल पुरस्कार देण्याबाबत शिफारस करण्यात यावी.

२) पोलीस पाटलाच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षणाची तरतूद व्हावी. ज्याप्रमाणे पोलिसासाठी पोलीस वेल्फअर फंड आहे त्याप्रमाणे पोलीस पाटलासाठी पोलीस पाटील वेलफअर फंडाची स्थापना करावी.

३) पोलीस पाटलांना प्रशिक्षण देण्यात यावे.

४) राज्यातील सर्व पोलीस पाटलांना ओळखपत्रे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या मार्फत मोफत पुरविण्यात यावीत. ओळखपत्रांवरील छायचित्रे पोलीस पाटलांनी स्वत: स्वखर्चाने लावावीत.

५) पोलीस पाटील पदाचे नूतनीकरणाचा कालावधी ५ वर्षांऐवजी १० वर्षांचा करणात येत आहे.

---

**२१. क्र.बी.व्ही.पी. १४९/१४/पोल-८ मंत्रालय, मुंबई ३२ दि. २४ जानेवारी १९९२**

नागरी विभागात असलेली पोलीस पाटलांची पदे खंडित करण्याबाबतच्या निर्णयाला स्थगिती.

---

■■■

# पोलीस पाटलांनी कर्तव्य पार पाडण्याबाबत काही व्यवहार्य सूचना : गुन्ह्याला प्रतिबंध

**१. दुर्जन व संशयित व्यक्तीवर नजर ठेवणे** : फौजदाराकडून ज्याच्यावर नजर ठेवावयाची अशा कुप्रसिद्ध दुर्जन व्यक्तींची नाव कळविली जातील. आपण त्यांच्या प्रामाणिक कार्यात अडथळा न आणता त्यांच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवाल. या व्यक्तींपैकी कोणी गाव सोडून दुसऱ्या गावात किंवा शहरात रहायला गेल्यास आपल्या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यास त्यांच्या जाण्याबद्दल आणि त्यांच्या जाण्याच्या अभिकथित ठिकाणाबद्दल तत्काळ कळविणे हे आपले कर्तव्य आहे.

**२. सराईत अपराध्यांवरील देखरेख** : तसेच काही प्रकरणात उक्त अधिनियमांतर्गत ज्या व्यक्तीबाबत निर्बंधाचा आदेश देण्यात आला अशा प्रत्येकाला पास द्यावा.

**३. संशयित परक्या व्यक्तीवरील देखदेख** : तुमच्या गावात संशयित परकी व्यक्ती आल्याचे ऐकीवात आल्यास, त्याचे पूर्वचरित्र आणि निवासस्थान यासंबंधी त्या व्यक्तीस प्रश्न विचारणे आणि पोलीस ठाण्यास त्याव्यक्तीबद्दल ताबडतोब कळविणे हे आपले कर्तव्य आहे. हे कर्तव्य फार महत्त्वाचे आहे.

**४. भटक्या टोळ्यांवर देखरेख** : भटक्या टोळ्या बहुधा गुन्हेगार असतात. त्या तुमच्या गावात गुन्हे करत नसल्या तरी दुसऱ्या ठिकाणी गुन्हे करण्यासाठी अड्डा म्हणून आपल्या गावाचा उपयोग करू शकतात,

किंवा घरफोडी करण्यासाठी सोयीस्कर घरे निवडू शकतात आणि नंतर केव्हा तरी गुप्तपणे परत येऊन घरफोडी करू शकतात किंवा दरोडा घालू शकतात. आपण त्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले पाहीजे. कोणत्याही भटक्या टोळीच्या येण्याबद्दल व जाण्याबद्दल पोलीस ठाण्याला आणि पोलीस चौकीला ताबडतोब कळविणे हे आपले कर्तव्य आहे. टोळीचे वर्णन टोळी नोंदवहीत लिहावे. नोंदवहीतील सर्व स्तंभ फार काळजीपूर्वक भरावे. गटागटातील वितुष्टे, गटागटातील भांडणे आणि वाद, सलोख्याने मिटविण्यासाठी आपण जास्तीत जास्त प्रयत्न करावे. परंतु पक्षांनी आपसातील मतभेदाबाबत तडजोड करण्याचे नाकारले आणि शांतता भंगाचा धोका वाटत असल्यास आपण फौजदाराला आगाऊ इशारा देऊन ठेवावा आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०७ अन्वये संबंधित व्यक्तींना ताब्यात घेण्यासाठी पुरावा गोळा करण्यास त्यांना मदत करावी.

**५. रात्रीची गस्त :** संशायास्पद रितीने फिणाऱ्यास पकडण्यासाठी आणि घरफोडी, चोऱ्या यांना आळा घालण्यासाठी रात्रीचे वेळी गस्त घालणे व आपल्या ग्राम पोलीसांच्या रात्रीच्या गस्तीवर देखदेख करणे हे आपले कर्तव्य आहे. दरोडेखोर आपल्या गावाच्या जवळपास आहेत असे कळले तर दरोडेखोरांचे हल्ले परतून लावण्याच्या दृष्टीने पुरेशा लाठ्या आणि दगड घेऊन काही गावकऱ्यांना चावडीत आळीपाळीने झोपायला आपण प्रवृत्त करावे. रात्रीचे गस्त घालण्याच्या बाबतीत पोलीस पाटील कसूर करत नाही आणि आवश्यक असेल तेव्हा कोतवाल यांना सोबत करतात यांची खात्री करून घेण्यासंबंधी सर्व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

**६. आंदोलन करणारे, वक्ते, सभा इत्यादी :** जर काही आंदोलन करणाऱ्यांची किंवा धर्मवेड्यांनी आपल्या गावाला भेट देऊन सभा घेतल्या,

भाषणे केली किंवा किर्तने किंवा परिसंवाद वा चर्चासत्रे आयोजित करून आपल्या गावातील शांतता भंग करण्याच्या हेतूने लोकांना उघड-उघड अथवा गुप्तपणे एखादी गोष्ट करण्याची चिथावणी दिली अथवा द्वेष, घबराट, अविश्वास किंवा मतक्षोभ भडकण्याची शक्यता असलेल्या अफवा पसरवल्या तर आपण आपल्या फौजदाराला त्यांच्या आगमनाबाबत आणि त्यांच्या वर्तणूकीबाबत माहिती कळवावी आणि ते आपला गाव सोडून जाईपर्यंत त्यांच्यावर नजर ठेवावी.

**गस्त क्षेत्रातील कर्तव्यस्थ पोलीस शिपायांना साहाय्य :-**

जेव्हा गस्त क्षेत्रातील कर्तव्यस्थ पोलीस आपल्या गावात येतील तेव्हा आपण आपल्या गावातील घटना संबंधीची, तसेच दृष्टप्रवृतीच्या व्यक्ती आणि त्यांना भेटणाऱ्या व्यक्ती आणि त्यांना भेटणाऱ्या व्यक्ती, गुन्हेगार जमाती, परक्या आणि संशयित व्यक्ती त्यांच्या वर्तणूकी संबंधीची (हि माहिती गस्त क्षेत्र कर्तव्यस्थ पोलिसांची वाट न पाहता ताबडतोब देण्यात येईल.) आणि त्याप्रमाणे तपास न लागणारा गुन्हा आणि एखादी सभा अथवा गावातील आंदोलन याबाबत गावातील अफवा, या सर्व गोष्टी संबंधीची आपल्याला असलेली संपूर्ण माहिती त्यांना द्यावी.

गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या गस्त पुस्तकात आपणाला प्रतिस्वाक्षरी (सही) करावी लागेल आणि तो आपल्या भेट नोंद पुस्तकार नोंद करील. गस्त क्षेत्रातील पोलीस गावात असतांनात गावातील भेट नोंद पुस्तकात नोंद करील यांची आपण खात्री करून घ्यावी आणि कोणत्याही सबबीवर भेट नोंद पुस्तक भरण्याकरिता अन्य ठिकाणी किंवा चौकीवर पाठवू नये. त्याचप्रमाणे पोलीस शिपायाने केलेली नोंद वाचल्याशिवाय गस्त पुस्तकात आपण प्रतिस्वाक्षरी (सही) करू नये. ती नोंद खरी असल्यासच, आपण त्या नोंदीच्या खाली जागा न सोडता आपली सही

करावी. गुन्ह्याशी मुकाबला करण्याच्या आणि शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या बाबतीत आपण पोलिसांच्या बरोबर आहात. परंतु पोलीस स्वत:च्या कर्तव्यात कसूर करत असता आपण त्यांना पाठींबा द्यावा असा त्याचा अर्थ नाही. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. स्वखर्चाने अथवा गावकऱ्यांच्या खर्चाने कोणत्याही दर्जाच्या पोलीस कर्मचाऱ्याला आपण कोणती वस्तू पुरविण्याची आवश्यकता नाही. उलट ते ज्या वस्तू घेतील त्याकरिता बाजारातील नेहमीच्या किंमतीनुसार त्यांच्याकडून पैसे घ्यावे. जेव्हा पोलीस तपासणीचे काम प्रामाणिकपणे करत असतील तेव्हा आपण त्यांचे आदेश पाळले पाहिजेत. परंतु त्यांची तपासणी अप्रामाणिक असल्याचे आपणास ठाऊक असल्यास, खोट्या पंचनाम्यावर सही करून किंवा अन्य प्रकारे आपण त्यांना मदत करू नये. उलट आपण ताबडतोब वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कळवावे. आपली स्वत:ची वर्तणूक जर सरळ असेल तर ते आपणास खात्रीने पाठींबा देतील. आपण आणि आपले ग्रामपोलीस आपल्या गावातील अप्रामणिक तपासणीला आळा घालू शकतात हे लक्षात ठेवावे.

**गुन्हा घडल्यानंतरची कर्तव्ये:–** बऱ्याच वेळा तक्रार करणांऱ्या व्यक्ती, अतिरंजीत दिशाभूल करणाऱ्या चुकीच्या अथवा खोट्या तक्रारी करतात. म्हणून तक्रार होताच पहिली करावयाची गोष्ट म्हणजे गुन्हा घडलेल्या स्थानाची पाहणी करणे आणि ज्यांना परिस्थितीची माहिती असण्याची शक्यता उघड आहे अशा तेथे उपस्थित असलेल्या लोकांकडे चौकशी करणे आणि अशा रितीने ग्राम पोलीस अधिनियमाच्या कलम १४ अन्वये आरोपीला पकडणे आणि त्याला पुरव्यासहित फौजदाराकडे पाठविणे ही करावाई करावी किंवा कसे यासंबंधी निर्णय घेण्यास स्वत:ला शक्य व्हावे. या प्राथमिक चौकशीमुळे आपणास गुन्ह्याच्या सत्यतेची आणि गांभिर्याची कल्पना येईल आणि त्या चौकशीत आपला तास दोन तासाहून अधिक वेळ कधीच खर्च होणार नाही. आपण संपूर्ण चौकशी करावी असा हेतू

नाही. तक्रार दिशाभूल करणारी नाही किंवा अपराध्यांना निसटून जाता येणार नाही याची निश्चिती करण्यासाठी आपण तत्परतेने उपाय योजून साधे व्यवहारज्ञान असलेली कोणतीही व्यक्ती करील अशी साधीसुधी ठळक चौकशी करावी.

**बेलिफांना मदत :–** पोलीस पाटलांनी बेलिफांना त्यांची शासकीय कर्तव्ये पार पाडण्याबाबत सर्व प्रकारची मदत द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**पुतळ्यांचे संरक्षणाकरिता पुढाकार :–** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गावोगावी पुतळ्यांची संख्या वाढली. मात्र पुतळ्यांचे संख्यावाढीबरोबर पुतळा संरक्षणाच्या दृष्टीने पुतळा स्थापन करणाऱ्यांनी काही प्रयत्न केले नाही. पुतळा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सुद्धा उदासीनता दिसून येते. पुतळा विटंबनाच्या घटना वढल्या व परिणामी गावातील विभिन्न समाजातील जातीय तणाव वाढला. आजच्या परिस्थितीमध्ये पुतळा संरक्षणाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. पुतळा विटंबनेच्या घटनेमुळे गावाचे व पर्यायाने समाजाचे लवकर न भरून निघण्यासारखे नुकसान होते. तेव्हा पोलीस पाटलांनी पुढाकार घेऊन त्यांच्या गावातील पुतळ्यांच्या संरक्षणाकरिता मोहल्ल्यातील लोकांवर जबाबदारी टाकावी. त्यांचे गावातील पुतळे खाजगी किंवा सार्वजनिक जागेत स्थपिलेले आहेत काय ते पहावे. गावातील जातीय भावना व तणाव कितपत आहे यावर सतत लक्ष ठेवावे. नवीन पुतळे स्थापन करण्यासाठी लोकांच्या हालचाली आहेत काय? त्याची माहिती ठेवावी. सरकारी जागेवर परवानगी शिवाय पुतळा बसविता येणार नाही याची जाणीव संबंधितांना करून द्यावी. पुतळा बसविण्याबाबत गावात काही लोकांचा विरोध आहे काय? त्यांची प्रतिक्रिया काय? यावर बारकाईने नजर ठेवावी. गावातील क्षुल्लक जातीय घडामोडीसुद्धा पोलीस स्टेशनच्या ठाणेदारास कळवाव्या. याच

प्रकारचे उपाय गावातील मंदिर, मशिद व इतर प्रार्थना स्थळे यांच्याबाबत करता येतील.

**महामार्गावरील गावाचे पोलीस पाटलांनी घ्यावयाची काळजी :-** महामार्गावर जी गावे आहेत त्या गावाचे पोलीस पाटलांनी रस्त्यावरील मोटार अपघाताबाबत व अपघातानंतर उद्‌भवणाऱ्या परिस्थितीला अनिष्ट वळण लागू नये म्हणून खबरदारी घेणे आवश्यक आहे. आज खेड्यामध्ये सुद्धा शहराप्रमाणे प्रक्षोभक जनमानस तयार होण्यास वेळ लागत नाही. पोलीस पाटलांनी त्यांचे गावातून किंवा लागून जाणाऱ्या महामार्गावर अपघात वारंवार कुठे होतात व का होतात याची माहिती ठेवावी. रस्त्याच्या कडेला गावकरी लोकांनी बाजार भरविणे, हातठेले लावणे, चहा-फराळाच्या टपऱ्या लावणे, प्रवाशांनी एस.टी.शेडमध्ये न थांबता अगदी रस्त्याच्या कडेला वाहनाची वाट पाहत बसणे, इकडे तिकडे न पाहता रस्ता ओलांडणे या व इतर अनेक कारणामुळे तसेच वाहने बेदारकारपणे चालविण्यामुळे अपघात होत असतात. अपघात झाल्यानंतर वाहनाचे चालक/वाहकाला मारणे किंवा वाहन जाळून टाकण्याचे प्रकार स्थानिक गावकऱ्यांकडून केले जातात. घटनास्थळी मृत्यू झाला असल्यास व प्रेत तिथेच पडून असेल तर जनतेच्या भावना अधिक भडकतात. तेव्हा प्रेत कापडाने ताबडतोब झाकून द्यावे. जखमी असल्यास त्यास कोणत्याही वाहनाने तात्काळ रुग्णालयात हलविण्याची सोय करण्यात यावी. पोलीस घटनास्थळी येईपर्यंत परिस्थिती सांभाळावी व पोलीस आल्यानंतर गावातील प्रतिष्ठितांना हाताशी घेऊन पोलीसांना मदत करावी व होणारा अनर्थ टाळावा. वाहतूक थांबली असल्यास सुरळित करण्याचा प्रयत्न करावा.

**अपघात, खून, हुंडाबळी, संशयास्पद मृत्यू इत्यादी बाबतीत**

**घ्यावयाची दक्षता :–** पोलीस पाटलाच्या कार्यक्षेत्रात खून, आत्महत्या, अपघात, दरोडा, हुंडाबळी इत्यादीमुळे होणाऱ्या संशयास्पद मृत्यूच्या बाबतीत पूर्वी तातडीने ज्युरी पंचनामा किंवा मरणोत्तर चौकशींचा पंचनामा पोलीस पाटलांकडून केला जात असे. अलिकडे पोलीस यंत्रणेचे जाळे व्यापक स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे पोलीस पाटलांनी असा पंचनामा करून मृतदेहाची विल्हेवाट लावणे उचित ठरत नाही.

गुन्ह्याच्या तपासासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने मृतदेहाची उत्तरीय तपासणी आरोग्य अधिकाऱ्यांकडून करून घेणे आवश्यक असते. म्हणून संशयास्पद मृत्यूच्या बाबतीत पोलीस पाटलाने घटना घडल्यानंतर ताबडतोब जवळच्या पोलीस ठाण्यात याबाबतचा अहवाल पाठवला पाहिजे व पोलीस तपास सुरू होईपर्यंत मृतदेहाची विल्हेवाट लावली जाणार नाही व घटनास्थळाजवळील परिस्थितीजन्य पुरावा नाहीसा केला जाणार नाही याची दक्षता घेऊन संशयित गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवले पाहिजे.

■■■

**जीवन म्हणजे एक अनंत**
**आव्हान, प्रदिर्घ साहस**
**व पात्रतेची खरोखर**
**कसोटीच होय**



# हुंडाबळी प्रतिबंध-पोलीस पाटील

समाजात विवाहित स्त्रियांच्या मृत्यूच्या घटनाचे प्रमाण वाढत आहे. पोलीस पाटील हा गावातील जबाबदार अधिकारी असल्यामुळे त्यास अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनांना प्रतिबंध करण्यासाठी कार्य करता येईल व त्यामुळे समाजातील होणाऱ्या अनिष्ट प्रकारांना आळा घालता येईल.

गावात असलेल्या नववधूस तिच्या पतीकडून अगद त्याच्या नातेवाईकांकडून शारिरीक अगर मानसिक त्रास होत असेल की, ज्यायोगे सदर नववधू आत्महत्या करण्यात प्रवृत्त होईल अशावेळी त्वरित लक्ष घालण्यास सांगून त्या स्त्रीस न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

पोलीस पाटलांनी हुंडाबळी व विवाहित स्त्रीस तिच्या पती अगर सासू-सासरा, दीर-नणंद यांच्याकडून शारिरीक व मानसिक त्रास देण्यात येत असेल तर अशा लोकांना समजावून सांगून या गुन्ह्यांना प्रतिबंध करावा.

विवाहित स्त्रीवर होणाऱ्या आत्याचाराबाबत गुन्हेगारास शासन होण्याच्या दृष्टीने भारतीय दंड संहिता मध्ये कलम ४९८(अ), ३०४(ब) व ३०६ ही कलमे अंतर्भूत आहेत.

या कायदेशीर तरतुदीसंबंधी पोलीस पाटलांनी गावातील लोकांना जाणीव करून द्यावी. त्यामुळे विवाहित स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारांना आळा बसेल.

पोलीस पाटलांनी संसार जोडण्याचे काम करावे. चुकूनही आपल्या हातून संसार मोडणार नाही याची खबरदारी घ्यावी. पोलीसांना छळाबद्दल, त्रासाबद्दल आगाऊ माहिती पुरवावी, जेणेकरून पोलीस अधिकारी असा एखादा गुन्हा दाखल होण्यापूर्वीच/जीव जाण्यापूर्वीच संबंधित लोकांना समज देतील.

■■■

# ग्रामसंरक्षण दल व पोलीस पाटील

मुंबई पोलीस कायदा कलम ६३ (ब) नुसाय ग्रामसंरक्षण दल स्थापन करता येते.

**ग्रामसंरक्षण दलाची रचना व कार्यपद्धती :-**

१) जिल्हा पोलीस अधीक्षक गावातील लोकांच्या व मालमत्तेच्या संरक्षणासाठी तसेच सार्वजनिक सुरक्षिततेसाठी ग्राम संरक्षक दल या स्वयंप्रेरित मंडळाची स्थापना करू शकतात.

२) या दलात गावातील २० ते ५० वर्षे वयोगटातील योग्य व्यक्ती सदस्य असू शकतात.

३) पोलीस अधीक्षक आपल्या आदेशाने असे सदस्य नेमू शकतात.

४) ग्रासंरक्षण दलातील सदस्यातून एका योग्य सदस्यांची दल प्रमुख म्हणून नेमणूक होते.

५) तालुकाच्या दलाच्या मार्गदर्शनासाठी पोलीस हवालदार, तालुका ग्राम संरक्षण अधिकारी म्हणून व योग्य व्यक्तीपैकी संयुक्त ग्राम संरक्षण अधिकारी म्हणून पोलीस अधीक्षकांना नेमता येईल.

६) दलाचे सदस्य जिल्हा अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली असतील व त्यांना याबाबत ठरविलेले शिक्षण देता येईल.

७) कोणत्याही सदस्याला प्रशिक्षणार्थ व कर्तव्य पार पाडण्यासाठी जिल्हा अधीक्षकास पाचारण करता येईल.

८) सदस्यास व अधिकाऱ्यास राज्य सरकारने ठरविलेले प्रमाणपत्र मिळेपर्यंत व कर्तव्यावर असताना पोलीसांचे विशेष हक्क व संरक्षण मिळेल.

९) महाराष्ट्र विधानसभा किंवा विधान परिषद किंवा स्थानिक संख्येचे सभासद होण्यास बाधा येणार नाही.

**ग्राम संरक्षण दलाचा हेतू:-** गावातील लोकांच्या संरक्षणासाठी मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी व स्वयंप्रेरित लोकांच्या मंडळास प्रोत्साहन देणे.

■■■

# ग्रामरक्षक दलाची अपेक्षित कर्तव्ये

**१) गोपनीय माहिती गोळा करणे :-** गावामध्ये किरकोळ कारणावरून, वादावरून अनेक वेळा गंभीर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. परंतु या किरकोळ घटनांची ताबडतोब माहिती पोलीस ठाण्यास समजत नसल्याने या किरकोळ घटनांना प्रारंभीय प्रतिबंध केला जात नाही. अशा घटनांची पोलीसांना माहिती देणे, त्याच प्रमाणे गावात काही नवीन दिसून आल्यास आणि त्याबाबत काही संशय असल्यास, त्याची माहिती पोलीसांना त्वरीत देणे. गावातील गन्हेगार व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर लक्ष ठेवून त्यांच्या हालचालीबाबत पोलीसांना वेळीच माहिती देणे.

**२) स्वरक्षण-समाजरक्षण :-** ग्रामरक्षक दल सदस्यांनी स्वतःच्या रक्षणाबरोबरच गावाचे आणि समाजाचे रक्षण करणे अभिप्रेत आहे. यामध्ये ते चोर, दरोडेखोर त्यांच्यापासून जीवितहानी व वित्तहानी यांचे रक्षण करण्यास बांधील आहे. स्वरक्षण व समाजरक्षण करण्यासाठी ग्रामरक्षक दल सदस्यांना हत्याराशिवाय प्रशिक्षण, लाठीच प्रशिक्षण, शिटी वाजविण्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. समयसूचकतेनुसार ग्रामरक्षक दल सदस्यांनी कृती करणे अपेक्षित आहे.

**३) अवैध धंदे :-** सर्वसामान्यपणे अनेक गावांमध्ये अवैध धंदे जसे जुगार, मटका, दारू, अंमली पदार्थ इत्यादींचे बेकायदेशिर धंदे चालू असतात. अशा धंद्यामुळे गावातील अनेक ग्रामस्थांचे संसार उध्वस्त होत असतात. यासाठी गावात जे अवैध धंदे चालतात त्यांची माहिती पोलीसांना देणे व पोलीसांकरवी या सर्व अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यास मदत करणे. त्याचप्रमाणे गावातील जनतेत जनजागृती करून ग्रामस्थांनी

अशा प्रकारच्या दारू, जुगार व मटक्याच्या धंद्यांवर जाणार नाही, त्यावेळी हे अवैध धंदे करणारे आपापले धंदे बंद करती व गाव अवैध धंदेमुक्त हाईल.

**४) नैसर्गिक आपत्ती :-** महापूर येणे किंवा दरडी कोसळणे या सर्वसाधारण येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती आहे. या नैसर्गिक आपत्तीमध्ये वित्तहानी बरोबर जीवितहानी सुद्धा मोठ्या प्रमाणात होत असते. अशा वेळी शासकीय यंत्रणा येईपर्यंत या नैसर्गिक अपत्तींपासून गावकऱ्यांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे, ग्रामस्थांना धीर देणे इत्यादी कर्तव्य त्वरीत केली पाहिजे. त्या प्रमाणे याबाबत शासकीय यंत्रणांना माहिती देणे.

**५) सामाजिक बांधिलकी :-** वरीलप्रमाण कार्ये करीत असतांनाच ग्रामरक्षक दलांनी सामाजिक बांधिलकीची व समजोपयोगी उपक्रमे हाती घ्यावयाची आहेत. पर्यावरण संरक्षण, प्रौढ शिक्षण, महिलांचे शिक्षण, स्वच्छता, अनिष्ठ रूढी चालीबद्दल जागरूकता निर्माण करणे इत्यादी अनेक कार्ये घेतली जाऊ शकतात.

**६) तंटामुक्त गाव :-** सर्वसाधारणपणे प्रत्येक गावात गटबाजी, वाद-विवाद व तंटे होत असतात. गावातील तंटे/वाद गावाच्या विकासात अडथळा निर्माण करतत. या तंट्यामुळे जनतेच्या पैशाचा/वेळेचा अपव्यय होतोच शिवाय गावात एकी राहत नाही. हे वाद किरकोळ कारणावरून होतात. उदा.- गावातील पुतळे, मान-पान, जुने वाद, अवैध धंदे इत्यादी. हे सर्व वाद/तंटे जागीच मिटले किंवा घडण्यापूर्वीच मिटविण्यात आले तर गाव तंटामुक्त होईल. यासाठी ग्रामरक्षक दल सदस्या अतिशय महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. प्रत्येक वाद

विवादात हस्तक्षेप करून ते स्थानिक स्तरावर सोडविण्याचा प्रयत्न करावा किंवा ज्या काही घटना त्यांच्या पातळीवर सुटू शकणार नाहीत अशा घटनांची वेळीच पोलीसांना माहिती द्यावी त्यामुळे प्रत्येक गाव तंटामुक्त होण्यात मदत होईल.

**७) कायद्याचे शिक्षण:-** भयमुक्त व तंटामुक्त गाव करण्यासाठी ग्रामरक्षक दल व जनतेस कायदा व त्यांचे कर्तव्याची पूर्ण जाणीव असली पाहिजे. कर्तव्याची जाणीव, जबाबदारी व कायद्याची माहिती असल्यास प्रत्येक नागरिक जबाबदारीने व विचाराने वागतील. त्यामुळे तंटे होणार नाही. प्रत्येक गाव भयमुक्त/ तंटामुक्त होण्यास मदत होईल. प्रत्येकाने त्याची कर्तव्ये समजून घेतली व कायदा माहित करून घेतला तर सर्व गावे भयमुक्त/ तंटामुक्त होतील. यासाठी ग्रामरक्षक दल सदस्य व जनतेने कायद्याची प्राथमिक स्वरूपाची माहिती करून घेतली पाहिजे.

**८) पर्यावरण संरक्षण :-** पर्यावरणाचा समतोल बिघडण्यास मनुष्यप्रणीच जास्त जबाबदार आहे. आवासतव जंगलतोडीमुळे जमिनीची धूप, अवर्षण व वातावरण प्रदूषण होते. ध्वनि, वायू, जल व भूमी यांचे प्रदुषण मोठ्या प्रमाणात होत आहे. अतिवृष्टी झालेल्या शहरात गटारे तुंबून शहर जलमय होण्यास प्लॅस्टिक च्या पिशव्याच कारणीभूत होत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ग्रामरक्षक दलाच्या माध्यमातून जनजागृती करून वृक्षारोपण करणे, अवैध जंगलतोडीस प्रतिबंध करणे, प्लॅस्टीक मुक्त गाव करणे इत्यादी अभियाने राबविता येतील.

**९) इतर अपेक्षित कर्तव्ये :-** संशयित भटकणाऱ्या गुन्हेगार टोळ्या गावात किंवा गावाच्या शिवारात आल्याची माहिती मिळताच ती पोलीसांना दिली पाहिजे. संशयास्पद कोणतीही घटना दुर्लक्षीत करू नये, यासाठी

सर्वकाळ चौकस दृष्टी ठेवावी. कोणी संशयित व्यक्ती संशयित मालासह सापडल्यास त्याच्याजवळच्या मालाची यादी करून पोलीसांना ही माहिती कळविली पाहिजे. दलाच्या सदस्यांनी गस्तीच्या वेळी धर्मशाळा, सर्व धर्मांची व समाजाची मंदिरे, मशिदी, दर्गे, धार्मिक स्थळे, राष्ट्र पुरूषांचे पुतळे, बस स्टँड, रेल्वे स्टेशन व ज्या भागात बँका आहे किंवा ज्या भागात सतत चोऱ्या होतात अशा ठिकाणी सतर्कतेने गस्त घातली पाहिजे. ज्या ठिकाणी मंदिरे, मशिद व प्रार्थनास्थळे यांची दारे रात्री बंद ठेवणे शक्य आहे , अशा वेळी ती दरवाजे बंद करण्याची विनंती संबंधितांना करावी. या सर्वांचे रक्षण म्हणजे आपली नैतिक जबाबदारी आहे असे समजून कर्तव्य केले पाहिजे. या ठिकाणांना वेळोवेळी भेट दिली पाहिजे व कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेवून ग्रामस्थांना सुद्धा याबाबत जागृत केले पाहिजे.

अनुचित प्रकार दिसता क्षणी त्यास प्रसिद्धी न देता तो प्रकार त्या ठिकाणाहून ताबडतोब नाहीसा करून पूर्वस्थिती निर्माण करणे. ज्या गोष्टीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो अशा वाच्यता न करता पोलीसांना माहिती देणे. आपल्या गावातील प्रश्न गावातील लोकांकडूनच सोडविले गेले पाहिजेत यामध्ये बाहेरील किंवा दुसऱ्या गावातील लोकांचा हस्तक्षेप करून तणाव निर्माण करण्याची संधी देवू नये. दरोड्याची खबर मिळताच काही विशिष्ट प्रकारचा इशारा ठरवून व देवून सर्वांना सावध केले पाहिजे.

संरक्षण यंत्रणेमध्ये ग्रामरक्षक दल अतिशय महत्त्वाचा घटक आहे. गाव भेटीस आलेल्या पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांना गावातील घडामोडीबाबत माहिती दिली गेली पाहिजे. कोणताही खून, खूनाचा प्रयत्न, दंगल अशा प्रकारचे गुन्हे अचानक होत नाही, त्यांच्या पाठीमागे काही तरी वाद असतो. हा वाद प्राथमिक अवस्थेत असतांना पोलीसांना कळविले पाहिजे. गावातील जागेवरून, भिंतीवरून,

पाण्यावरून, धान्य दुकानावरून, स्त्रिया व महिलांवरून होणाऱ्या वादावर बारीक लक्ष ठेवून पोलीसांना वेळीच माहिती दिली पाहिजे. गावात चाकू, तलवारी, अवैध शस्त्रे बाळगणारे व्यक्तींची पोलीस ठाण्यास माहिती दिली पाहिजे.

गावामध्ये एखादा नवखा माणूस आला व तो गावात काही उपद्रव, उचापती करीत असेल, तसेच तो विनाकारण खर्चीत चैन करीत असले तर त्याबाबत पोलीसांना माहिती दयावी. चोर, दरोडेखोर यांच्या हालचालीवर लक्ष ठेवून गुन्हेगार, गुन्हेगारांची मित्रमंडळी व नातेवाईकांची माहिती पोलीसांना दयावी. गावात आलेल्या फरारी किंवा पोलीसांना वांछित असलेल्या आरोपी बाबत माहिती मिळाली असल्यास ती गुप्तपणे पोलीसांना द्यावी.

■■■

**कायदा व सुव्यवस्था ही**
**सतत जपण्याची बाब आहे**





# तंटामुक्त गाव

महात्मा गांधी तंटामुक्त गाव
मोहीम झाली सुरू ।
गावातील वाद गावातच मिटवून
सर्व मिळून गावाचा विकास करू ।।

होऊ लागल्या बिनविरोध
छोट्या मोठ्या निवडणुका ।
नाही जाऊ लागला
वेळ अन् पैसा फुका ।।

दारू, जुगार अवैध धंदे
चालविणारांचे झाले वांधे ।
ग्रामस्थांची रात्र गस्त
चोर, दरोडेखोर झाले त्रस्त ।।

पोलीस अन् कोर्टाचा
कमी होईल ताण ।
गावातच मिटवून तंटे
वाढवू गावाची शान ।।

मोहिमेतील सहभागी गावांना
विकासाबरोबर बक्षिसांची संधी ।
गावामध्ये येईल रामराज्य
खुश होतील स्वर्गीय महात्मा गांधी ।

# बुलडाणा जिल्हा पोलीस वरील अधिकारी संपर्क क्रमांक

| वरिष्ठ अधिकारी कार्यालय | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|
| पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ऑफीस - ०७२६२-२४२३९५<br>नि.स्थान - ०७२६२-४२३०३ |
| अप्पर पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ऑफिस - ०७२६२-२४४९२५<br>नि.स्थान - २४२४६६<br>ऑफीस - २०२ |
| अप्पर पोलीस अधीक्षक, खामगाव | ०७२६३ -२५२०४८ |
| पो.उपअधिक्षक (गृह) | ०७२६२ -२४२१०१ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर | ०७२६७ - २२२३६८ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, बुलडाणा | ०७२६२ - २४२३२६ |
| पो.उपअधिक्षक, अर्थिक गुन्हे शाखा, चिखली | ०७२६२ - २४२७३८ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी<br>देउळगावराजा, सिंदखेडराजा | ०७२६१ - २३१६५० |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, मेहकर | ०७२६८ - २२५९७५ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव | ०७२६३ - २५२१६७ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगांव जा. | ०७२४ - २४३४१११ |
| पोलीस उपअधिक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंध शाखा, बुलडाणा | ०७२६२ - २४२५४८ |

# बुलडाणा जिल्हा पोलीस संपर्क क्रमांक

| अ.क्र. | कार्यालय | एसटीडी कोड | दूरध्वनी |
|---|---|---|---|
| | **उपविभाग बुलडाणा** | | |
| १. | बुलडाणा शहर | ०७२६२ | २४२३२७ |
| २. | बुलडाणा ग्रामीण | ०७२६२ | २४१२५५ |
| ३. | बोराखेडी | ०७२६७ | २४५२२६ |
| ४. | धामणगाव बढे | ०७२६७ | २४१५४१ |
| ५. | चिखली | ०७२६४ | २४२०६७ |
| ६. | अमडापूर | ०७२६४ | २६४०३४ |
| ७. | धाड | ०७२६२ | २६५१३२ |
| ८. | रायपूर | ०७२६२ | २७००३० |
| | **उपविभाग मेहकर** | | |
| १. | मेहकर | ०७२६८ | २२४५३६ |
| २. | डोणगांव | ०७२६८ | २६६२४० |
| ३. | जानेफळ | ०७२६८ | २६२५३३ |
| ४. | साखरखेर्डा | ०७२६४ | २६६०३८ |
| ५. | लोणार | ०७२६० | २२१३२१ |
| ६. | बिबी | ०७२६० | २७१२५० |
| | **उपविभाग देउळगांव राजा** | | |
| १. | देऊळगांव राजा | ०७२६१ | २३२००२ |
| २. | सिंदखेड राजा | ०७२६९ | २३४२४४ |
| ३. | किनगांव राजा | ०७२६९ | २६४४३३ |
| ४. | अंढेरा | ०७२६१ | २६५०३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| **उपविभाग खामगांव** | | | |
| १. | खामगांव शहर | ०७२६३ | २५२०३८ |
| २. | शिवाजी नगर | ०७२६३ | २५२१४२ |
| ३. | खामगांव ग्रामीण | ०७२६३ | २५२२९५ |
| ४. | पिंपळगांव राजा | ०७२६३ | २७१२३४ |
| ५. | हिवरखेड | ०७२६३ | २६६६३६ |
| ६. | शेगांव शहर | ०७२६५ | २५२०१० |
| ७. | शेगांव ग्रामीण | ०७२६५ | २५३०१० |
| ८. | जलंब | ०७२६५ | २७७५४२ |
| | | | |
| **उपविभाग मलकापुर** | | | |
| १. | मलकापूर शहर | ०७२६७ | २२२०१८ |
| २. | मलकापूर ग्रामीण | ०७२६७ | २२२२५८ |
| ३. | एमआयडीसी दसरखेड | ०७२६७ | २६२४०० |
| ४. | नांदुरा | ०७२६५ | २२१०२८ |
| ५. | जळगांव जा. | ०७२६६ | २२१५३० |
| ६. | तामगांव | ०७२६६ | २३२२३२ |
| ७. | सोनाळा | ०७२६६ | २३८५३८ |
| | | | |
| **स्थानिक शाखा** | | | |
| १. | आर्थिक गुन्हे शाखा | ०७२६२ | २४२७३८ |
| २. | स्थानिक गुन्हे शाखा | ०७२६२ | २४२७३८ |
| ३. | जिल्हा विशेष शाखा | ०७२६२ | २४१०४० |
| ४. | कल्याण शाखा/ सायबर सेल | ०७२६२ | २४७७६७ |
| ५. | FRO/पासपोर्ट | ०७२६२ | २४१०४० |
| ६. | नियंत्रण कक्ष बुलडाणा | ०७२६२ | २४२४०० |

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

प्रत्येक गोष्टीची किंमत वेळ आल्यावर कळते
म्हणून फुकट मिळणारा ऑक्सिजन
हॉस्पिटलमध्ये खूप महाग मिळतो.



आपण लावलेलं एक झाड
येणाऱ्या पिढीसाठी वरदान ठरेल

पोलीसपाटील हा गाव पातळीवरील पोलीस यंत्रणेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पोलीसपाटील या पदावरील व्यक्तीने नि:पक्षपाती राहून कर्तव्य चोखपणे बजावले तर त्याचा फार मोठा फायदा प्रशासनास होईल.

**पोलीस पाटील म्हणजे पोलीस यंत्रणेचा ग्रामीण भागातील कणा...**



**बुलडाणा जिल्हा पोलीस दल**

मुद्रणस्थळ : मयुरेश प्रिंटिंग, जालना मो : ९८२२०७५०२३